# नीति कथा

भाग १

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा० वा०
वा. क्र. १६४८५



# नीतिकथा

भाग – १

संकलन

एल. जे. लारसन

रजिस्टर्ड

म. ... शास्त्र.
दा. ...
दि. ...
सर्वाधिकार सुरक्षित.

ओरिएंटल वॉचमन पब्लिशिंग हाऊस

सॅलिसबरी पार्क – पुणे १ भारत

F. 1—ST. Marathi Vol. 1

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ललितेचे 'मोठ्ठे आश्चर्य' ... | ७ |
| २ | "नाही" ... ... ... | ११ |
| ३ | म्हातारे घड्याळजी ... ... ... | १५ |
| | नीतिवचने ... ... ... | २० |
| ४ | पॅट्सीची मदत ... ... ... | २१ |
| | खरा मित्र ... ... | २४ |
| ५ | जिमी स्टॅण्डबीचा विश्वासूपणा ... ... | २५ |
| ६ | मुलगा आणि कुत्रा ... ... ... | २९ |
| | पवित्र शास्त्र ... ... ... | ३१ |
| ७ | घरक्रांती ... ... ... | ३३ |
| ८ | पारितोषिक विजेते घड्याळ ... ... | ३५ |
| ९ | तुम्ही पुढे राहणार का ? ... ... | ४१ |
| १० | सुमति कां गेली नाही ? ... ... | ४५ |
| ११ | एका हत्तीची गोष्ट ... ... ... | ४९ |
| १२ | ख्रिस्तमसचे मर्म ... ... ... | ५३ |
| १३ | ग्रोटीअसची सुटका कशी झाली ... ... | ५७ |
| १४ | खरा देव ... ... ... | ६१ |
| १५ | प्रामाणिकपणा हे सर्वोत्कृष्ट धोरण ... .. | ६५ |
| १६ | पुष्पा पुट ऑफ ... ... ... | ६९ |

# संग्रहकर्त्यांचे दोन शब्द . . .

या पुस्तकाच्या प्रकाशकांना गेली काही वर्षे विनंती करण्यात आली होती की त्यांनी अशा प्रकारची पुस्तके छापावी की ज्यांच्यात व्यवहारात आणण्याजोग्या नीतिपूर्ण कथांचा समावेश असावा, परंतु जी सर्वसाधारण जनतेला परवडण्याजोगी असावीत. म्हणून या प्रकारच्या पुस्तकांची मालिका बनविण्यात आली व तिच्यात घरी अथवा शाळेत सांगितल्या वा वाचल्या जाण्याजोग्या गोष्टी संग्रहित करण्यात आल्या. मालिकेच्या या पहिल्या भागातल्या गोष्टी मुलांकरता मनोरंजक असून आईवडिलांना सोईस्कर होतील अशा आहेत. आजच्या परिस्थितीला अनुकूल असतील अशाच गोष्टींचा संग्रह करण्याचा यत्न प्रकाशकांनी केला आहे व आमच्या माहितीप्रमाणे या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. यांतील काही कथांच्या लेखकांची माहिती उपलब्ध नाही. काही कथा खालील इंग्रजी पुस्तकांमध्ये प्रकाशित झाल्या होत्या :—

The Story Hour, Home and School, Our Little Friend, The Teacher's Word, Christian Uplook, The Presbyterian and Youth's Companion.

काही कथा खालील लेखकांनी लिहिल्या आहेत :—

हॅरिएट होल्ट, फे एन. मेरीमन, डॅफनी लॅसी, एफ. जे. ओब्रियन, झेलिया मार्गारिट वॉल्टर्स, एम. जे. वाईन, केट मेल्ड्रॅम बस, एन्जल्स पॅट्री, मॉण्ड विलकॉक्स, नीडर मेयर, विलियम जे. मे, आणि जूलिया वुल्फ.

नीतिकथांची ही पुस्तके निरनिराळ्या भाषांतून प्रकाशित झाली आहेत. दक्षिण आशियातल्या जनतेची एक मोठी गरज दूर होईल या आशेने ती प्रकाशित करण्यात आली आहेत.

एल. जे. लारसन

संग्रहकर्ता



आपल्या बागेची देखरेख करणे ललितेला फार आवडे

दि.

# ललितेचे 'मोठ्ठे आश्चर्य'

ललिता आठ वर्षांची झाली त्यावर्षीच्या उन्हाळयांत तिच्या वडिलांनी तिला भाजीपाल्याच्या बागेतला एक कोपरा देऊन टाकला. तिच्या वडिलांनी जमीन खणली. ढेकळं फोडून सपाट केली. तेव्हा ललिता आणि तिची चौदा वर्षांची बहिण सुलोचना यांनी त्या जमिनीत टोमॅटोच्या बिया रुजत टाकल्या. कारण ललितेला टोमॅटो फार आवडत असत. आपल्या इवल्या कुणग्याभोवती ललितेने सुंदर फुलझाडेहि लावली. 'माझी बाग सुंदर दिसायला हवी' असं ती म्हणायची.

पुढे ललितेच्या वडिलांनी तिला जमिनीतून वर आलेली रसरशीत अशी डझनभर टोमॅटोची रोपटी दिली. ललितेने ती लगेच बागेत मधोमध लावून टाकली.

ललिता त्यांची निगा राखी. सबंध उन्हाळयांत आगंतुकपणे उगवणारे रान ती उपटून टाकी. एका किटकाला किंवा किडयाला तिने आपल्या रोपटयाजवळ घर करू दिले नाही. उष्म्याच्या दिवसांत रात्रीहि ती रोपटयांना पाणी घाली. त्यांना फुले आली. परंतु टोमॅटोचे एक सुंदर रोपटे सोडले तर फळाचे काही चिन्ह दिसेना. ते रोपटे मात्र उठून दिसायचे. त्याची पाने हिरवीगार व सरळ होती. त्यावर बारीक हिरवे टोमॅटो दिसू लागले. ललिता त्यांच्याकडे कौतुकाने पाहायची. सप्टेंबरच्या सुरवातीस तर तिची आणि सुलोचनाची नजर एका सुंदर

टोमॅटोवर खिळली. तो टोमॅटो इतका मोठा झाला की वाटायचे त्याचे वजन एक शेर भरेल.

एके दिवशी ललितेचा भाऊ तिला म्हणाला, "मी माझे कोंबडे जिल्हा प्रदर्शनासाठी नेणार आहे. मला वाटतं की त्याला पहिले बक्षीस मिळेल."

ललितेच्या मनात आपल्या मोठ्या टोमॅटोचा विचार आला व ती आपल्या बहिणीकडे धावली. ती आपल्या बहिणीला विचारू लागली, "सुलोचना, प्रदर्शनात लोक टोमॅटो ठेवतात का ग ?"

"ठेवतात की ! या प्रदेशातल्या सर्वोत्कृष्ट व मोठ्यात मोठ्या टोमॅटोला बक्षीसहि असते. तुझा तो मोठा टोमॅटो का नाही प्रदर्शनाला नेत ?"

"खरंच नेता येईल?" ललितेने आनंदाने उडी मारली.

"का नाही?" सुलोचना पुढे म्हणाली, "बाबा तर म्हणतात की या भागात इतका मोठा टोमॅटो त्यांनी कधीच पाहिला नाही. तूं रोप लावलंस. त्याची काळजी घेतलीस. बेधडक पाठवून दे."

जिल्हा प्रदर्शन म्हणजे त्या भागातील सर्व मुलांना मोठ्यात मोठी घटना वाटायची. जवळजवळ प्रत्येक मुलाच्या पाळीव जनावरांचा त्यात समावेश असायचा. प्रत्येक लहान मुलगी स्वत: बनवलेला केक नाहीतर स्वत:चे शिवणकाम प्रदर्शनात ठेवायची.

"तूं आई - बाबांना थक्कच का नाही करीत ? हे बघ, कुणाजवळ काहीसुद्धा बोलू नकोस. परीक्षक विजयी उमेदवारांची नांवे वाचतील. तेव्हा 'पहिले बक्षीस कुमारी ललिता हीस' असे म्हणतील. ते ऐकून आई - बाबा चकित होतील. मग ते तुला निळी रिबीन देतील. खूप मजा येईल."

"हो, खरंच !" ललिता आनंदाने म्हणाली.

मग सुलोचनाने त्या दुपारी एका कार्डावर लिहिले व ते ललितेला दाखविले. त्यावर लिहिले होते "आठ वर्षांच्या ललितेने वाढविलेला टोमॅटो."

"टोमॅटो आठ वर्षांचा असं त्यांना नाही वाटले म्हणजे झाले!" ललिता हसत म्हणाली.

"आपण बाबा, आई, दादा प्रदर्शनाला गेलें की टोमॅटो काढू या. माझ्या चांगल्याश्या टोपलीतून तो नेऊ या. आपण दोघंच बसनं जाऊ."

प्रदर्शनाची जागा तिथून फार अंतरावर नव्हती. साहजिकच मुलांना एकटं जाण्याचीहि परवानगी मिळाली होती.

त्यानंतर जेव्हा सुलोचना आणि ललिता बागेत आपला आवडता टोमॅटो काढण्यासाठी गेल्या तेव्हा तिथे तो टोमॅटोच नव्हता !

'बापरे!' ललिता ओरडली. "कुणी तरी माझा सुंदर टोमॅटो चोरला" म्हणत ती रडू लागली.

सुलोचनाने आपल्या वहिणीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु ते कठीण होते. प्रदर्शनाकडे जात असतांना रस्ताभर ललिता सारखे आपले अश्रु पुसत होती.

सर्व मुली प्रथम पाळीव जनावरे ठेवलेल्या दालनात गेल्या व नंतर फळभाज्या ठेवलेल्या दालनात आल्या. तोच काय आश्चर्य ! इतर अनेक टोमॅटोत ललितेचा सुंदर टोमॅटो होता. पाहताक्षणीच तिने तो ओळखला.

परीक्षकांनी बक्षिसे देण्यास प्रारंभ करताच मुली आपापल्या आईवडिलांना बिलगून राहिल्या. ललितेचा टोमॅटो उचलून एक परीक्षक म्हणालें, "याला पहिलं बक्षिस मिळालं आहे. हा एक आदर्शवत् असा टोमॅटो आहे. इतका चांगला वाढलेला टोमॅटो मी कधीही या भागात पाहिला नाही. आठ वर्षांच्या कुमारी ललिता हिने तो वाढविला. कुमारी ललिता, कृपाकरून पुढे येशील काय ?"

ललिता मंचावर चढली व तिने निळ्या फितीचा स्वीकार केला तेव्हा सर्वांनी जोरांत टाळ्या वाजविल्या. ती थक्क झाली होती. काहीशी घाबरलीही होती. तरी पण आभार मानायचं मात्र ती विसरली नाही.

ती आपल्या वडिलांच्या जवळ गेली तेव्हा त्यांना म्हणाली, "बाबा, माझा टोमॅटो इथे कसा हो आला ?"

"का बरं? मी आणला. मला तुला थक्क करायचं होतं," वडील हसत तिला म्हणाले.

"परंतु मी आणि सुलोचनाने तो आणून तुम्हाला चकीत करायचे ठरवलं होतं," ललिता म्हणाली.

"परीक्षक काय म्हणतात ते ऐक," तिचे वडील म्हणाले.

"या सुंदर टोमॅटोला कुणी नांव सुचवील का ?" परीक्षक सर्वांना विचारीत होते.

ललिताचे वडील एकदम म्हणाले, "मी सुचवितो, आपण त्याला 'मोठ्ठं आश्चर्य' म्हणू या."

मग सगळं कुटुंबच्या कुटुंब हसलं, कारण सर्वांनाच ती एक मोठी गम्मत वाटली.

# “‘नाही”’

“नाही” तो शब्द स्पष्ट, धारदार व सणसणीत होता. त्यावरील आघाताने तिकडे कुणाचे लक्ष वेधलं नसतं तरच नवल.

‘असं’ नाही ‘म्हटलेलं क्वचित ऐकायला मिळतं,’ एक सद्‌गृहस्थ सोबतच्या माणसास मैदानातून जात असताना म्हणत होते.

“असं म्हटलेलं सहसा ऐकू येत नाही. ज्या मुलाने ‘नाही’ म्हटलं तो ‘होय’ असंही तितक्याच ठामपणे म्हणू शकतो. तो मुलगा या ठिकाणी नव्यानंच आला आहे. तो पोरका आहे. दोन मैलावर आपल्या चुलत्याकडे तो राहातो. तो नेहमी चुलत्याचे ज़ेवण आणतो व रात्री परत जातो. तो कामही खूप करतो. म्हाताऱ्या चुलत्याच्यानं होत नाही असं त्याचं खूप काम करतो. त्याचे कपडे मळके असतात पण तो अभ्यासात हुशार आहे. तो सर्वांचा आवडता आहे. सर्वांचाच त्यावर विश्वास आहे.”

“चांगलाच दिसतो. त्याला भेटायला हवं. अशी जोमदार पोरं आजकाल फारच दुर्मिळ आहेत.”

“खरं आहे. दासला आपल्याला भेटायचंय तर या बाजूनं या.” ते काही पावलावरील एका दरवाजापाशी उभे राहिले. तेथे एक मुलांचा घोळका एका



फोटो–विद्यावर्त

अशा सुदृढ शरीरयष्टीची मुलं हल्ली दुर्मिळ झाली आहेत.

विपयावर चर्चा करीत होता. "ती गोष्ट ठीक नाही. ती मी कदापि करणार नाही. मी 'नाही' म्हणतो तेव्हा मला तसंच वाटत असतं."

"ठीक आहे. परंतु इतकं ओरडून ती दुसऱ्यांच्या कानावर कशाला घालायला हवी?" एक जवळचा मुलगा उतावीळपणे त्याला सांगत होता.

"मला काय म्हणायचं ते प्रत्येकाला कळायलाच हवं असं मला वाटतं. जे माझं नाही ते मी कधी घेणार नाही. आणि मी कुणाला मुळीच भिणार नाही."

"जरा गम्मत केली तर त्याचं हे एवढं कशाला करायला पाहिजे! केली गम्मत. तुला तर थोडीहि थट्टा नाही चालत."

"मला वाईट गोष्ट कधीही चालत नाही. मी प्रथमच 'नाही' म्हटलं."

"दास, तुझ्याकडे माझं थोडं काम आहे."

"काय साहेब" म्हणत मुलगा दरवाजातून बाहेर आला व श्री मॅथ्यूजना काय म्हणायचं ते ऐकायला अदबीने उभा राहिला.

"तुझ्या काकाकडे आंबे विकायचे आहेत?"

"नाही साहेब, होते परंतु ते त्यांनी विकले. माझ्या वाट्याचे दोन मणभर आहेत. आपण विकत घ्याल का, साहेब?"

"किंमत पटली तर घेईन. त्याची काय किंमत ही तुला माहीत आहे का?"

"होय साहेब."

"ठीक आहे. मी ते घेतो व तू माझ्या घरून पैसे ने."

थोड्या मुलाखतीत त्रयस्थाला दासचं अगदी जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाली. दुसऱ्याच दिवशी दासच्या चुलत्याकडे त्याला बोलावणं गेलं. त्याला एक उत्तम मित्र मिळाला. दैव फळाला आले. तो मोठा होताच त्याला

मोठ्या पगाराची नोकरी देण्यात आली. तो विचारतो हे सगळं आपल्यासाठी का करण्यात आलं?

"कारण योग्यवेळी तू 'नाही' असे म्हणू शकतोस," असे त्याला मालक म्हणतो. ते पुढे म्हणाले, "नाही" हा शब्द तूं बोललेला जेव्हा प्रथम मी ऐकला तेव्हा तो तू विचारपूर्वक म्हणाला होतास. बरीच माणसे, तरुण तसेच वृद्ध या शब्दाच्या अभावी नामशेष झाली आहेत. त्यांना एखादी वाईट गोष्ट करायची नसते परंतु ते कांकुं करण्याच्या भरात त्यालाच बळी पडतात. जो मुलगा 'नाही' असे ठामपणे म्हणायला कचरत नाही तो पुढे खचितच सन्माननीय पुरुष म्हणून नावारूपाला आल्याशिवाय राहात नाही."

# म्हातारे घड्याळजी

कमला दिवाणखान्यातल्या खुर्चीत बसली होती. ती नाराज होती. कमलला बाहेर जायचं होतं. परंतु वडिलांनी तिला नकार दिला. साहजिकच कमला रुसली.

"मी एकदाची मोठी झाले की मग ठीक होईल. मग मला हे शीक नि ते शीक असला त्रास दिला जाणार नाही. स्वत:ला वाटेल ते करायचं, कुणाचा अडथळा नाही."

खुर्चीच्या घोळात स्वत:ला अधिक लोटीत ती घड्याळाची जुनी संथ टीक–टॉक ऐकू लागली. ते घड्याळ फार फार जुन्या काळातलं होतं. त्याला 'जुनी नियती' म्हणत. त्यावर तसे लिहूनच ठेवले होते. नंतर ती स्वत:च्या मनगटावरील घड्याळाची जलद टिकटिक ऐकू लागली. तेव्हा विस्तवातील निखाऱ्यांची चित्रे होत असल्याचा तिला भास झाला. मग तिला झोप लागली.

घरात शांतता होती. जाजमावरून मांजर गेले. खुर्च्या कुरकुर हसल्या व त्यांनी जुन्या रानातल्या आठवणी एकमेकांना सांगितल्या. तरी भयाण शांतता होती. तेवढ्यात कमलाचे मनगटी घड्याळ बडबडायला लागले. सगळ्याच घड्याळांची जी सतत बडबड चालते तशी .



फोटो—एन्. रामकृष्ण

कधी कधी तो वृद्ध घड्याळजी माझ्यातील सारी यंत्रणा, चक्र पाहत बसे.

"जुन्या घड्याळाच्या दुकानातल्या काळपट भिंतीवर खिळ्याला लटकत राहण्याऐवजी या उबदार खोलीत पुन्हा येऊन कमलाच्या हातावर मला बसायला मिळालं याचा मला फार आनंद होत आहे."

"दुरुस्तीकरीता तुला जावं लागलं होतं वाटतं?" जुन्या घड्याळाने आपल्या धारदार आवाजात विचारले.

"हो. आम्ही ज्या कारखान्यात बनलो तो सोडल्याला काही फार दिवस नाही झाले. तिथे आमचा वेळ गप्पा गोष्टीत खूप चांगला गेला."

"मला आपले एका दुकानातच तयार करण्यात आले," जुने घड्याळजी म्हणाले.

"हो. मला वाटलंच. आपण जुन्या पद्धतीचे आहात, नाही का? अद्ययावत सर्व घड्याळे कारखान्यातच तयार होतात. आम्ही तयार झालो तेव्हा कुणी चांगला माणूस आम्हाला घेऊन जाईल, तो लिहायला लागला की आम्हाला ते वाचता येईल, तो काही खाऊ लागला की ते पाहाता येईल, आणि तो कुठे जाईल तिथे त्याच्याबरोबर आपल्याला फिरता येईल, अशी आम्ही स्वप्ने रचत असू."

"फार दिसू नये म्हणून मी माझे हात माझ्या चेहऱ्यासमोर धरतो," म्हातारे घड्याळजी म्हणाले.

"मी सुद्धा तसंच करते. परंतु माझे हात इतके लहान आहेत की मला सर्व काही दिसतं. एके दिवशी एका गृहस्थाने कमलाकरता मला विकत घेतले. परंतु मी नीट काम करते का ते पाहाण्यासाठी काही काळ स्वतःच वापरण्याचे ठरविले."

म्हाताऱ्या घड्याळजीचं तिच्या बोलण्याकडे फारसे लक्ष नव्हते. ते आपले जोरदारपणे टीक–टॉक करीत होते.

"काही वेळाने नुसती टीक टॉक करणे त्रासाचे झाले. साठ सेकंदाचा एक मिनिट. साठ मिनिटांचा एक तास. बारा तास तबकडी भोवती फिरायचे. नि मग पुन्हा तेच. तेव्हा मी मनात आणलं तर अधिक जलद चालू शकेन, असं धन्याला दाखवायचं ठरवले. नुकतीच मला चावी दिली होती. म्हणून जोराने चालायला जमेल असे वाटत होते. मी जोराने चालायला लागले. मला वाटले की माझे धनी आता आपल्यावर खूष होतील.

"एकदा ते सावकाश रेल्वे स्टेशनकडे जात होते. साहजिकच त्यांनी माझ्याकडे पाहिले. तोच ते काहीतरी पुटपुटले आणि जमेल तितक्या जलदीने चालायला लागले. खरे म्हणजे ते स्टेशनच्या दिशेने धावतच सुटले.

"अकरा तेहत्तीस गेली?" त्यांनी विचारले.

"नाही, साहेब," स्टेशनमास्तर म्हणाले. "तिला यायला अजून पंधरा मिनिटे आहेत."

तेव्हा माझ्या धन्याने माझ्याकडे पुन्हा पाहिले. "नीट वेळ दाखविणारं घड्याळ आजकाल मिळायचं नाही कधी! !" ते म्हणाले. "हे तर जवळजवळ वीस मिनिटं पुढे आहे."

"त्यांनी मला न्यायला हवं होत," म्हातारे घड्याळजी म्हणाले. कमला त्या कल्पनेने स्वप्नातहि हसली.

"मग त्यांनी रेग्यूलेटर इतका काही खाली आणला की मला कामच करता येईना. किती कठीण काम ! मला चाकं फिरविता येईनात. प्रत्येक सांधा दुखायला लागला आणि स्प्रिंगतर जवळजवळ तुटल्यासारखीच झाली. खूप केली शिकस्त परंतु उपाय चालेना.

"माझे धनी कुणा महत्त्वाच्या व्यक्तिला भेटायला गेले होते. त्यांनी लिहिलेल्या पत्त्यामुळे मला सगळे माहीत होते. मला वाटले की मी फार सावकाश चालले आहे. म्हणून मी होईल तेवढी जलदी केली. परंतु मला ते काही जमेना. बरं मला जमत नाही हेही सांगता येईना. धन्याला वाटलं बराच अवधि आहे. परंतु ते जेव्हा तिथे गेले तेव्हा ती व्यक्ती त्यांना भेटली नाही. मग त्यांनी मला दोष दिला."

"बरोबर आहे. वेळ आपण नाही सांभाळायची तर कुणी ?" म्हातारे घड्याळजी म्हणाले.

"परंतु मला ते कसे कळणार ? मी फार पुढे गेले म्हणून त्यांनी मला फार हळू चालायला भाग पाडले. नंतर त्यांनी मला एका जुन्या दुकानात नेले. त्या दुकानाचा मालक एक गमतीदार डोळ्याचा गमत्या म्हातारा होता. तो म्हणाला, "हे चांगले घड्याळ आहे. ठीक करून नीट चालायला शिकविले की होईल काम. काही दिवस ठेऊन द्या. पाहातो." मग त्या म्हाताऱ्या गृहस्थाने मला एका खिळ्याला

लटकत ठेवले. केव्हा केव्हा तो माझी चाके स्प्रिंग पाहण्यासाठी खाली काढायचा. त्याने इथे तिथे आटा घट्ट केला. कधी अधिक कापला किंवा काही स्प्रिंगस बदलल्या आणि मग मला परत केलं.

'चांगले घड्याळ आहे, साहेब. थोडं ठीक करावं लागलं. आता नीट वेळ दर्शवील. मागे किंवा पुढे होणार नाही.' असं दुकानदार माझ्या धन्याला म्हणाला व अशा तऱ्हेने मी इथे आले."

"अस्सं. मग आता तुला दुरुस्त केलं आहे तर!" म्हातारे घड्याळजी पुढे म्हणाले, "मी तुला थोडा सल्ला देतो. इतक्या दिवसात उभ्या उभ्याने मीच तो लिहिला आहे." मग त्यांनी टोला देण्यापूर्वी घसा साफ केल्यासारखा आवाज केला व बोलू लागले.

"मी आहे घड्याळजी फार फार म्हातारा.
टिक टॉक टिक टॉक
जिब्राल्टरचे कुठलेही खडक, तसा मी आहे ताठ तडक.
टिक टॉक टिक टॉक
मी मिनिटे मोजतो, तास वाजवितो,
खरी वेळ दाखविण्याची शिकस्त करतो.
मी अंधारात चालतो. प्रकाशातही चालतो.
टिक टॉक टिक टॉक....
या म्हाताऱ्या घड्याळजीकडून घ्या धडा
नीट वेळ दाखवायला शिका जरा
टिक टॉक टिक टॉक.
हवेच्या कोंबड्यासारखे बदलू नका, बदलू नका.
टिक टॉक टिक टॉक.
आपण जर पळालो फार, तर लोकांना बसतील धक्के
आपण जर चाललो हळू, तर बनू आपण हसण्याचे एक्के
आपण नाही दाखविली योग्य वेळ, तर मग बनू कडमडायचे खड्डे.
टिक टॉक टिक टॉक....

# नीतिवचनें

माझ्या मुला, आपल्या बापाचा बोध ऐक, आपल्या आईची शिस्त सोडू नको; कारण ती तुझ्या शिराला भूषण, व तुझ्या गळ्याला हार अशी आहेत.

आपला कान ज्ञानाकडे देशील, आणि आपले मन सुज्ञानाकडे लावशील; जर तू विवेकाला हाक मारिशील, सुज्ञतेची आराधना करशील; तर परमेश्वराच्या भयाची तुला जाणीव होईल, आणि देवाविषयीचे ज्ञान तुला प्राप्त होईल. कारण ज्ञान परमेश्वर देतो;

परमेश्वराचे भय हे ज्ञानाचा प्रारंभ होय, पण मूर्ख लोक ज्ञान व शिक्षण तुच्छ मानितात.

माझ्या मुला, परमेश्वराचे शिक्षण तुच्छ मानूं नको आणि त्याच्या शासनाला कंटाळू नको; कारण जसा बाप आपल्या आवडत्या मुलाला, तसा परमेश्वर ज्याच्यावर प्रीति करतो त्याला शासन करितो.

(नीतिसूत्रे)

# पॅट्सीची मदत

तिचं खरं नांव पॅट्रिसिआ. ती इवलीशी मुलगी आणि नांव मोठं. तेव्हा सर्वजण तिला पॅट्सी म्हणत.

पॅट्सी बायबल क्लासला जात असे. तिला वाटायचं देवासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे.

"लहान मुलींना करण्यासारखं खरोखरीच काही नाही." ती जिक्स नांवाच्या कुत्र्याच्या पिल्लाला म्हणाली.

जिक्स भुंकला. आपली शेपटी हलविली आणि आपल्या छोटया मालकिणीशी आपण सहमत असल्याचे दर्शविले. केव्हा केव्हा जिक्स इतकी जोराने शेपटी हलवायचा की पॅट्सीला वाटायचं ती तुटते की काय ?

"मी मिस् जेकब इतकी मोठी असते तर चायनात जाऊन शिक्षिका बनले असते. देवासाठी काही करायला मिळतं तर बरं झालं असतं," ती स्वत:शी म्हणाली. ती इवलीशी मुलगी शांतपणे बसली होती. तिने कोपर गुढग्यावर टेकले होते. हनुवटी हाताच्या तळव्यावर टेकली होती.

तेवढयात केट मावशी खेळायच्या खोलीच्या दारात आली व म्हणाली, 'पॅट्सी, माझी दोऱ्याची गुंडी खालच्या मजल्यावर राहिलीय. ती जरा धावत जाऊन मला आणून दे बरं."

क्षणभर पॅट्सीला ते रुचलं नाही. ती विचारातच मग्न होती. कुणी व्यत्यय आणायला नको होता. तरी तिने विचार केला, मी पटकन उडी मारून गुंडी आणली,

तर नंतर मला बसून विचार करायला अधिक वेळ मिळेल. तेव्हा ती जिन्यावरून धावत खाली गेली.

'ही घे, केट मावशी,' काही वेळातच ती गुंडी मावशीच्या मांडीवर ठेवीत पॅट्सी म्हणाली.

'छान,' केट मावशी म्हणाली.

पॅट्सी मग आपल्या खेळायच्या खोलीत गेली व पुन्हा विचार करीत बसली. 'मी मोठी असते नि संगीत शिकले असते तर चर्चमध्यें गायले असते. खरंच, जगभर गातच सुटले असते. मग खरोखरीच माझ्या हातून काही घडलं असतं."

"पॅट्सी, माझी छकुली पॅटसी, कुठंय ?"खालच्या मजल्यावरून आईची हाक आली.

क्षणभर पॅट्सीने उत्तर दिलं नाही. आपण कुठं आहोत, ते कुणालाच कळायल नको असं तिला वाटत होतं. कारण तिला शांतपणे विचार करीत बसायचं होतं. परंतु मग तिला आठवलं की आईच्या हाकेला ओ न देणं बरं नाही. ती लगेच उठली आणि दिवाणखान्यात निघून गेली.

'मी इथेच आहे, आई,' ती वरच्या पायरीवरून येत असतांना म्हणाली.

"पॅट्सी, कोंबडीच्या पिल्लांना दाणे टाकायची वेळ झाली. अद्याप भाऊ घरी नाही परतला. तेव्हा बाळ, आवारात जा आणि माझ्याकरिता कोंबड्यांना दाणे टाकायचं काम कर."

"अरे देवा, देवाकरता काही करायचं असतं तर बरं होतं," पॅट्सीने उसासा टाकला. कुणीच एकादं द्यायला तयार नाही असे तिच्या मनाला वाटले.

तरी पण कोंबड्यांना दाणे टाकण्यातहि पॅट्सीला मजा वाटे. कोंबड्या कोकलतात, दाणे टिपतात ते तिला आवडे. त्यात पॅट्सीचे एक आवडते पिल्लू होते. त्याला ती हातातून दाणे खायला लावी. तसे दाणे खायला त्या पिल्लाला बराच वेळ लागे कारण ते भ्यायचे. ते एखादं पाऊल टाकून पुढे सरकायचे नि मग दोन पावले मागे व्हायचे. अखेर ते जवळ आले. अगदी नजिक आले. टोंच मारली. एक दाणा हातातला गेला. दोन टोंचा, दोन दाणे संपले !

कोंबड्यांना दाणे टाकण्यात पॅट्सीचा इतका वेळ चांगला जाऊ लागला की आपल्याला काही खास विचारासाठी सर्व वेळ हवा होता याचा जवळजवळ विसरच पडला. जवळजवळ परंतु संपूर्ण मात्र नाही. कारण ती जेव्हा घरांत गेली तेव्हा आईला म्हणाली, "आई, लहान मुलांना देवासाठी करता येईल असं काहीच नाही का ग ?"

आईने जेवणासाठी टेबल लावायचे काम मध्येच थांबविले नि मुलीला जवळ घेतले.

"केट मावशीची धाग्याची गुंडी धावत जाऊन कुणी आणून दिली ?" तिने प्रेमाने विचारले.

"मी आणून दिली, आई," पॅट्सी म्हणाली.

"आणि आता खेळ टाकून कोण गेलं पिल्लांना दाणे टाकायला ?"

"मी, आई," पॅट्सी म्हणाली. त्यावेळी आपल्या आईच्या हाकेला ओ न देण्याचा जो एक विचार तिच्या मनात झळकून गेला होता त्या दुष्ट क्षणाची आठवण झाली. आता मात्र तिला आपण उत्तर दिल्याबद्दल खूप आनंद झाला.

"आपण जेव्हा मन:पूर्वक आणि हसतमुखाने आपली कामे करतो तेव्हा स्वर्गातल्या देवाला आनंद होतो," पॅट्सीच्या केसावरून हात फिरवीत तिची आई तिला म्हणाली.

"खरंच ? इवल्याश्या आजारी पिल्लाला दाणे मिळावे, त्या दांडग्या पिल्लालाच सर्व मिळू नये म्हणून मी जी धडपडले ते पाहून देवाला आनद झाला असेल?" पॅट्सीने अत्यंत सुखावून आईला विचारले.

"होय, खरोखरीच आनंद झाला असेल!"

"तर मग देवासाठी सारखी काही ना काही मी करीतच होते!" सुखद जाणीवेने पॅट्सी अधिकच उजळली.

तेवढ्यात जिक्स भुंकला. त्याने आनंदाने शेपूट हलवले. तो त्याचा हसण्याचाच प्रकार असावा. पॅट्सी त्याला थोपटीत म्हणाली, "चल जिक्स तुझी सुद्धा जेवायची वेळ झाली."

# खरा मित्र

( ताल : दादरा गजल )

पहा येशू मित्र कसा !
सर्वांपेक्षां ममताळ ।।धृ.।।

१ पापी जन तारायासी
खाली तो उतरला ।
धनी सृष्टीचा असता
गव्हाणीत निजला ।।

२ आशीर्वाद घ्यायासाठी
लोक बाळा आणिती ।
शिष्य धिक्कारिता पाही
निषिधिले त्याप्रती ।।

३ मार्था मार्या यांचा भाऊ
लाजारस जै मेला ।
दु:खी होऊनिया तेव्हा
कण्हुनिया रडला ।।

४ शिष्य नम्र होण्यासाठी
पाय त्यांचे धुतले, ।
रुमालाने पुसुनिया
उदाहरण दाविले ।।

५ पाप्यांसाठी दु:ख, निंदा,
पाठलाग सोशिला, ।
खिळे, भाला साहुनिया,
प्राण त्याने सोडिला ।।

६ आता स्वर्गीही असूनी
करितसे तो मध्यस्थी ।
आम्ही लवकर फिरावे
वेळ हो दिली किती ! ।।

( एक्लेसियेची सद्गिते )

# जिमी स्टॅण्डबीचा विश्वासूपणा

लेब्रॅडरचे प्रसिद्ध डॉक्टर ग्रीनफेल आणि त्यांचे कुत्रे यांनी उघड्या अफाट समुद्रावरील बर्फात रात्र गुजरली त्याची गोष्ट आपल्यापैकी काहींना आठवत असेल. आज मी आपल्याला गोष्ट सांगणार आहे ती स्वत: डॉ. ग्रीनफेल यांनीच सांगितलेली आहे. ते तिला ' जिमी स्टॅण्डबीची गोष्ट ' असे म्हणतात.

जिमी हा लेब्रॅडरमधील एक मुलगा. तो डॉक्टर ग्रीनफेल यांना त्यांच्या शूरपणाबद्दल चाहत असे. त्याचं असं झालं. एकदा एका भयंकर रात्री बर्फाचे मोठे वादळ निर्माण झाले होते. तेव्हा डॉक्टर ग्रीनफेल आपल्या कुत्र्यांचा समूह घेऊन आले व त्यांनी जिमीच्या आईचा जीव वाचविला. तेव्हापासून जिमी म्हणायचा, " केव्हा तरी मी डॉक्टर ग्रीनफेलचा पट्टशिष्य होणारच."

" केव्हा तरी माझा तू पट्टशिष्य होणार तर ! " डॉक्टर त्या मुलाला विचारीत असत. " मग तू माझ्यासाठी काय करणार ? "

तेव्हा जिमी तेरा वर्षांचा होता. तो ताठ उभा राही व म्हणे, "मी आपलं वाहन हाकीन. आपल्या कुत्र्यांची काळजी घेईन. आपण जे काही सांगाल ते मी करीन."

"कुणालाहीं असें करणें फार कठीण आहे, जिमी,' डॉक्टर त्याला म्हणत, " तुला ते कसे जमेल ? "

" आपण फक्त एकदां संधि द्या आणि पडताळा घ्या."



जमिनीवर बर्फाचा थर तयार झाला होता. थंडीचा जोर वाढला होता.

"उद्या माझ्याबरोबर सहलीस येतोस? मी तीन दिवसासाठी उद्याच निघणार आहे." डॉक्टर ग्रीनफेलनी एकदा त्याला विचारले.

जिमीच्या डोळ्यात आनंद दिसला. डॉक्टर म्हणाले, "ठीक. तयार राहा. गरम कपडे घाल. कदाचित् वादळ सुटेल. याच वेळी उद्या मी वाट पाहीन. तू माझा शिष्य होणार ना!"

"मी तुमचाच असणार," जिमी निश्चयाने म्हणाला.

जिमी, डॉक्टर आणि कुत्रे ठरल्याप्रमाणे बर्फातून निघाले.

"जिमी, ती पावले कुणाची?" डॉक्टरने विचारले. "ती रानाच्या दिशेने गेली असून ते बहुधा मुंगूस असावे. आपल्याला बरेच दिवस मांस नाही खायला मिळाले. मी मुंगूसाच्या मागे गेलो तर तू कुत्र्यांना सांभाळशील?"

"होय. मी आपल्या आज्ञेबाहेर नाही. त्याचकरिता तर मी इथे आलोय." जिमी म्हणाला.

डॉक्टर ग्रीनफेलनी कुत्र्यांना झाडाला बांधले. बंदूक घेतली व मुंगसाच्या मागावर रानात अदृश्य झाले. जिमी बर्फात इकडे तिकडे थोडा वेळ भटकला मग त्याला वाटलं, "कुत्र्यांना काही खायला द्यावं. जेवायची वेळ झाली." कुत्र्यांना खूप भूक लागली होती. त्यानी ते खाऊन टाकले. जिमीनेही आपले जेवण केले. तरी डॉक्टर परत येईनात. एक तास झाला. दुसरा तास गेला. डॉक्टर गेले तरी कुठे? रानात कुठे हरवले की काय? वारा वाढला. थंडी जोराची पडली. कुत्रे अस्वस्थ होऊन सुटून जायची धडपड करू लागले.

"पुन्हा त्यांना खायला घालतो." जिमीच्या मनात विचार आला. आता फारच कमी मांस उरलं होतं. पहिल्या वेळेस त्याने कुत्र्यांना बरंच घातलं होतं कारण त्यानं ऐकलं होतं की कुत्र्यांना खायला नाही मिळालं तर पिसाळून ते माणसांनाच फाडून खातात! .

नंतर त्याला आपल्याशी कुणी बोलत आहे असं वाटलं. "इथं एकटं रहाणं किती मूर्खपणाचं आहे! रात्र व्हायच्या आत घरी जा. अंधार पडायच्या आत तू पोहंचशील. डॉक्टर ग्रीनफेल तुला साफ विसरले आहेत. कुत्रे आपले आपण बघतील." जिमीने आपले दात घट्ट आवळले. "नाही, मी घरी मुळीच जाणार नाही. मी मेलो तरी इथेच राहीन."

पुन्हा तो रानात एका बाजूला जाऊन डॉक्टरांना जोरजोरात हाका मारू लागला. परंतु उत्तर आले नाही. अशा तऱ्हेने दिवस गेला. कुत्र्यांना खायला काही उरले नाही. कसल्या मदतीचीही आशा उरली नाही. अंधारी रात्र आली. तिच्यासोबत गारठून टाकणारे हिमवादळ आले. निसटून जाण्यासाठी धडपडणारे कुत्रे गप्प झाले. जिमी ब्लँकेटमध्ये शिरला आणि झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी लोकांना जिमी बेशुद्धावस्थेत सापडला. त्याचे पाय व हात गारठून गेले होते. त्याला हळूच उचलून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. शुद्धीवर आल्यावर जिमी विचारू लागला, " डॉक्टर ग्रीनफेल कुठे आहेत ? "

" ते रानात हरवले होते. ते सारखे तुझीच विचारपूस करताहेत."

"त्यांना सांगा, मी तिथेच राहिलो. " जिमी हळूवार आवाजात बोलला. ती भयंकर रात्र होऊन पुष्कळ वर्षे लोटली. आज आपण डॉक्टर ग्रीनफेलच्या एखाद्या इस्पितळाला भेट दिलीत तर तुम्हाला लाकडाच्या पायाचा आणि लोखंडाच्या रुळीच्या हाताचा एक माणूस दिसेल. "डॉक्टर ग्रीनफेलच्या कुत्र्यां-बरोबर तो रात्रभर बाहेर राहिला होता," असे लोक सांगतील. ते असेही म्हणतात, " त्याचा एक पाय व एक हात बर्फात पार गारठून गेला होता. तो आता डॉक्टरांना त्यांच्या कामात मदत करीत असतो. असंही म्हणतात की डॉक्टर ग्रीनफेलचे त्याच्याविना चालत नाही."

त्याचं नांव ? त्याला जिमी स्टॅण्डबी म्हणतात. डॉक्टरांचा माणूस म्हणून त्याचा उल्लेख होतो.

मुलांनो व मुलींनो, लक्षात ठेवा, जेव्हा तुम्हाला काही काम करायला सांगण्यात येईल तेव्हा जिमीचा धडा लक्षात आणा. त्याच्याप्रमाणे प्रामाणिकपणे आपले काम पार पाडा.

# मुलगा आणि कुत्रा

हरी स्वयंपाक घराच्या दरवाजात उभा राहिला. त्याने आपल्या शर्टाखाली कुत्र्याचे पिल्लू धरले होते. पिल्लाच्या ओलसर काळ्या मिशा त्याच्या हनुवटी जवळ दिसत होत्या. पिल्लाची बाकदार काळी शेपटी त्याच्या शर्टाखाली हालत होती.

"आई, एक कुत्रा आहे. तो अगदी स्वच्छ आहे. फार चांगलाही आहे. तो कधी चावत नाही. चांगला आहे तो, आई."

रस्त्यावरचे ते पिल्लू घरी राहू देण्यासाठी मुलाच्या डोळ्यात एकवटलेली याचना आणि चेहऱ्यावर दिसणारा चिंतातूर भाव आईने एकदा पाहून घेतला.

" कुत्रा ? नकोरे बाबा. त्यांचा फार त्रास होतो. ते जमीन उकरतात. लोकांना चावतात. त्यांना पुन्हा खायला प्यायला द्यावं लागतं. लहान मुलांसारखी निगा राखावी लागते. नको रे बाळ, आपल्याला कुत्रा नको."

हरीने अधिक प्रयत्न केला. तो म्हणाला, " पण आई, हा फार चांगला कुत्रा आहे. त्याला खायला काही मिळत नाही."

" त्याला हवं तर हाडूक नाहीतर भाकरी दे खायला. परंतु घरी मात्र नको आणू त्याला."

हरी हळूच मग दरवाजाबाहेर पडला. त्याने त्या पिल्लाला रस्त्यावर सोडले. तिथे ते पिल्लू आनंदाने उड्या मारू लागले. त्याच्याबरोबर इकडे तिकडे बागडले.

" तितका काही दिसायला वाईट नाही कुत्रा." हरीची आई खिडकीचा पडदा बाजूला सारून पाहतांना उद्गारली. " तरी पण सापडेल ते जनावर मी त्याला घरी नाही आणू द्यायची. तो मग घराचा राणीबागच करून टाकायचा!"

त्या संध्याकाळी हरी नाराज होता. तो लवकरच झोपी गेला. घरात सर्व शांत झालं. सगळेजण झोले गेली. तेवढ्यात मागच्या दरवाजाजवळ जमीन उकरल्याचा आणि भुंकल्याचा आवाज ऐकू आला. हरी धडपडत उठला आणि खाली गेला. तिथे मग तो त्या पिल्लाबरोबर बोलू लागला.

" मला फार वाईट वाटतं, परंतु तुला गोविंदच्या आवारातल्या लाकडी पिपातच जाऊन झोपावं लागेल. तू माझाच कुत्रा आहेस. तरी तुला गोविंदच्या आवारात झोपावं लागेल. जा. पळ. तिथे जाऊन झोप. चांगला कुत्रा ना तू? मग जा बघू कसा."

हरीने दरवाजा बंद केला. तो झोपी गेला. असे तीनदा झाले तेव्हा हरीची आई त्याला म्हणाली, " हरी, त्या टोपलीत राहू दे त्या पिल्लाला. तो तुझ्या खोलीत आजची रात्र झोपला तर तुला तरी झोप लागेल."

ती असं म्हणाली मात्र नि सगळं कसं ठीक झालं. सकाळी जेव्हा हरीची आई त्याला उठवायला गेली तेव्हा तिला हरी गाढ झोपलेला दिसला. पिल्लाला त्याने आपल्याजवळ घेतले होते. त्याचा एक हात कुत्र्याच्या अंगावर होता. ती जेव्हा आत आली तेव्हा ते पिल्लू तिच्याकडे पाहू लागले. आपली शेपूट हलवू लागले.

" तुला 'राहायचय वाटतं या घरात ठीक! परंतु बिछान्यात झोपायचं तर तुला नेहमी आंघोळ करावी लागेल."

" बाईसाहेब, आपण काय म्हणाल ते मी करीन, आपण म्हणाल तसं घडेल." कुत्र्याचे पिल्लू जणू शेपूट हलवीत तिला उत्तर देत होते.

# पवित्र शास्त्र

१ शास्त्ररूप दिवा देवाने दीधला ।
वाट दावायाला पाप्यां लागी ।।

२ शास्त्राविण पाप्यां कैसी दिसे वाट ? ।
अंधकार दाट जगदारण्यी ।।

३ निशास्त्रवादी हे सांगती कौतुक ।
सद्सद्विवेक हेचि शास्त्र ।।

४ तुम्हा आम्हा एक सद्सद्विवेक ।
मग का अनेक भिन्न मते ? ।।

५ सद्सद्विवेका वाट दावायास ।
शास्त्राचा प्रकाश पाहिजेची ।।

६ होऊनिया नम्र सोडा ऐसे मत ।
पहा की प्रचीत सच्छास्त्राची ।

( उपासना संगीत १७४ )



कुटुंबातली सगळीच एकमेकांशी प्रेमाने व गोडीने वागू लागली तर घर सुखी बनेल.

# घर-क्रांती

" लीला गेली, हे फार वाईट झाले," शालिनी दुःखी स्वरात म्हणाली. सारेजण जेवणासाठी एकत्र जमले होते.

" का ? ती गेली म्हणून तुला खरंच वाईट वाटते ?" सुशिलानं तिला. विचारले.

शालिनीने मान हलवली. " मला तसे म्हणायचे नव्हते. मला म्हणायचे होते की बाहेरचे कुणी सोबत असले की आपण जरा अधिक सभ्यपणाने वागतो."

दचकून साऱ्यांनी एकमेकांकडे पाहिले. " कार्टी काय बोलते," प्रमिला तोंडातल्या तोंडात पुटपुटली. नंतर ती शालिनीकडे वळून म्हणाली, " आपण अधिक सभ्य कसे काय वागतो ? "

शालिनीने आपले मोठे डोळे साऱ्यांवरून फिरविले. थोडासा विचार करून ती म्हणाली, " बाबा आपल्याशी खूप बोलतात, आईची वेशभूषा–केशभूषा अधिक चांगली असते. सुंदर न सांगता कामे करतो, सुशीला गोष्टी ऐकून उगीचंच हसते आणि तू –

" मी काय ? माझे वागणे कसे असते अशा वेळी ? " प्रमिलाने तिला चटकन विचारून प्रोत्साहन दिले.

" ते मला बरोबर सांगता येणार नाही," शालिनी विचार करीत म्हणाली. " पण तू अधिक चांगली आणि नाजूक वाटतेस. नेहमी असतेस तशी गडबडी वड-बडी आणि अंगात वारे भरल्यासारखी नसतेस एवढे नक्की."

त्यावर सर्वजण हसले. त्यामुळे साऱ्यांवरचा ताण नाहीसा झाला. प्रमिलाने आपले तोंड वेंगाडत " चांगली आणि नाजूक " हे शब्द पुन्हा उच्चारले आणि ती पुढे म्हणाली, " एकंदरीत हे शब्द खास असे काही सांगत नाहीत. अर्थात मला हे शब्द आवडत नाहीत हे याचे कारण असू शकेल. आता आपण सारेजण मिळूनच हा प्रश्न सोडवू या. मी खरंच इतरांच्या समवेत अधिक नाजूक आणि चांगली असते का ? "

सगळ्यांनी चटकन् एका आवाजात उत्तर दिले, " नाही." प्रमिलाने दीर्घ श्वास सोडला. नंतर ती म्हणाली,

" तर मग या स्पष्ट आणि मनमोकळ्या न्यायाने माझ्यावर सर्वात मोठा आरोप केला आहे. म्हणून मी म्हणते की आपण सारे यापुढे असेच वागू या.– आईने केशभूषा–वेशभूषा सुंदर ठेवावी, बाबांनी आपले मनोरंजन करावे, सुशीलाने साऱ्यांच्या गोष्टीत रस घ्यावा, त्या गोष्टी जुन्या असल्या तरीही. सुंदरने आपली कामे अशीच चोख करावी आणि प्रमिलाने– छान. प्रमिलाचे काय करायचे ते मी पाहीन. थोडक्यात काय, आपण सर्व रोज सभ्य आणि सुसंस्कृतपणाने एकमेकांशी वागू या. मान्य आहे ? "

" होय," सर्वांनी एकसूरात मान्यता दिली.

" तर मग सभ्य स्त्री पुरुषहो," प्रमिला वक्त्याचा आव आणीत बोलली, "आजपासून आपल्या घरात क्रांती सुरू ! "

# पारितोषिक विजेते घड्याळ

पुष्कळ वर्षापूर्वी विलायतेत एका मोठ्या जंगलाच्या मध्यभागी वसलेले एक खेडेगाव होते. एकेकाळी या खेडेगावातले लोक घड्याळे बनविण्याकरिता प्रसिद्ध होते. आता फारच कमी घड्याळे तिथे बनविली जातात. कारण जुने कारागीर मरून गेले आणि त्यांची मुले मोठमोठाल्या शहरात पैसा मिळविण्यासाठी निघून गेली. त्यांना शहरे अधिक मजेशीर वाटू लागली. खेड्यातले जीवन मागासलेपणाचे वाटू लागले.

एकदा त्या देशाच्या राजपुत्राने त्या खेड्यास भेट दिली आणि एकेकाळी बनविलेली काही सुंदर घड्याळे पाहिली. आता अगदी कमी कारागीर तिथे राहीले आहेत ही गोष्टही त्याच्या कानावर गेली.

राजपुत्र म्हणाला, "इतकं चांगलं काम थांबावं ही किती खेदाची गोष्ट आहे. या हिवाळ्यात जी घड्याळे बनवली जातील त्यातील दोन उत्तम घड्याळांना मी बक्षिसे देणार आहे."

ही बातमी खेड्यात पसरली आणि जे घड्याळे बनवीत होते ते बक्षीस मिळविण्याच्या प्रयत्नाला लागले.

जोसेफ नावाचा एक मुलगा आपल्या आजोबासोबत राहत होता. हिवाळ्यात सायंकाळी भरपूर बर्फ पडलं की तो आजोबाच्या शेजारी बसून ते लाकडाची घड्याळे



जंगलांनी वेढलेल्या गावात जोसेफ राहत होता.

कशी बनवितात ते पाही. ते पाहून पाहून पुढे तो घड्याळे बनवायला शिकला होता.

"मला बक्षिस मिळवायचंय," तो आजोबाना म्हणाला. "तुम्ही मला मदत कराल तर ते आपल्याला सहज शक्य आहे."

परंतु त्याच्या आजोबाला काही खात्री नव्हती.

"आपण आहोत अगदी गरीब. सुंदर घड्याळ बनवायला आपण उत्तम रंग किंवा मुलामा किंवा सोने वा चांदी कुठून आणणार? आपल घड्याळ अगदीच साधं होईल."

जोसेफ म्हणाला, "हो, साधं परंतु उत्तम. त्यांत नवीन काय करायचं याचाच मी विचार करीत आहे."

नवं आणि उपयोगी एकाच वेळी असणं ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. जोसेफला दिवसांचे दिवस या गोष्टीचा विचार करण्यांत घालवावे लागले.

एकें दिवशी जोसेफ जंगलांत गेला. बर्फ वितळू लागला होता. वसंताच्या आगमनाच्या खुणा सर्वत्र दिसत होत्या. तेवढ्यांत कोकिळेचे मधूर स्वर त्याच्या कानां-वर पडले.

जोसेफला वाटले, "कोकिळाच मला नवी कल्पना देईल" आणि तसे झालेही.

"नुसतेच टोले वाजण्याऐवजी कोकिळा गाऊ लागली तर फार बहर येईल"

जोसेफ आपली नवी कल्पना आजोबांच्या कानावर घालायला व ती कितपत जमेल याचा विचार करायला धावत घरी गेला.

आजोबाने या कल्पनेवर खूप विचार केला व मग म्हटलें, "शक्य आहे. कांही करता येईल. परंतु कसं काय ते एकदा ठरवलं पाहिजे."

त्यांनी लगेच कागद, पेन्सिल व पट्टी घेतली. घड्याळ आणि कोकिळा यांचा आराखडा तयार करून कोकिळा घड्याळाच्या बाहेर कशी येईल ते ठरवले.

मग त्यांनी कामाला सुरुवात केली. लवकरच उत्तम भलेमोठे घड्याळ तयार झाले. परंतु ते दिसायला अगदीच साधे होते. रोज शेजाऱ्यांनी बनविलेल्या घड्याळांच्या आकर्षक कथा कानावर पडत होत्या.

एकाने आपल्या घड्याळाच्या चेहऱ्यावर एक सुंदर फळ रंगविले होते. दुसऱ्याने आपल्या घड्याळाला चांदीचा मुलामा दिला होता. तिसऱ्याने एक कोरीव व कमालीचे सुशोभित बनविले होते. तरी आजोबा म्हणत होते, "जोसेफ, काही मनाला लावून घेऊ नकोस, आपलेच घड्याळ खरेखुरे नवे आहे. ते चांगले आहे. ते बनविल्यावर जर नीट चालले तर कदाचित आपल्यालाच बक्षिस मिळेल."

शेवटी घड्याळाचे काम खरोखरीच संपले. आजोबांनी त्याला चावी दिली' एकला पाच मिनिटं असल्याची वेळ त्यांनी लावली. ते नीट चालतं का पाहण्यासाठी ते दोघे इतके उत्सुक होते की ती पाच मिनिटं त्यांना फार मोठा कालावधि वाटला.

एक वाजता तो लहान पक्षी बाहेर आला, 'कुहू' म्हणून ओरडला आणि लगेच आत गेला.

"ते काम करतं. ते चालतं. किती छान ! आपल्यालाच बक्षिस मिळेल," जोसेफ आनंदाने उद्गारला.

शेवटी तो मोठा दिवस उगवला. सर्व घड्याळे परीक्षणासाठी खेड्यातल्या एका प्रशस्त जागी नेण्यात आली. राजपुत्र व राजकन्या त्या ठिकाणी आली व त्यांनी त्यांच्याकडे काळजीपूर्वक पाहिले.

काही मोठी होती व सुंदर होती. त्यांचे रंग आकर्षक होते. त्यांचे कोरीव काम आणि मुलामा मनात भरत होता. जोसेफचं हृदय खचू लागलं. त्याचं साधं, लहानगं घड्याळ कोपऱ्यात एकाकी पडल्यासारखं दिसत होतं.

"तास तरी भरत आला असता न् त्यानं आवाज केला असता तर किती बरं झालं असतं," असा जोसेफच्या मनात विचार आला. परंतु दोन वाजून तर नुकतीच दहा मिनिटे झाली होती. थोड्याच वेळात राजपुत्र घड्याळे पाहून निघून जाईल याची भीति त्याच्या मनाला वाटत होती.

अधिक वेळ मग तसं राहाणं त्याच्याने होईना.

"महाराज, मी माझं घड्याळ थोडं पुढं करून ते कसं वाजत दाखवूं का?" असं तो राजपुत्रास म्हणाला.

"हो, पण तुझं घड्याळ तरी कुठंय्? तू तर तरुण कारागीर दिसतोस," राजपुत्र त्याला म्हणाला.

जोसेफने घड्याळ दाखविले. राजपुत्र त्याच्याकडे पाहून हसला, कारण ते अगदीच साधं आणि लहान होतं.

"ठीक, मुला, ते तास भरण्याइतकं पुढं कर," राजपुत्र कीव येऊन जोसेफला म्हणाला.

जोसेफने घड्याळाचे काटे फिरविले व मिनिटाभरात तीन वाजले. एक पक्षी बाहेर आला. कुहू! कुहू! कुहू! असे तीनदा ओरडून आत गेला आणि मग दरवाजा बंद झाला.

"शाब्बास," राजपुत्र आनंदाने म्हणाला. राजकन्याही हसली.

"हेच पहिले पारितोषिक विजेते घड्याळ. त्यात काही नाविन्य आहे आणि तेच तर आम्हाला हवंय"

अशा तऱ्हेने जोसेफला पहिले बक्षिस मिळाले. त्या पैशातून त्याने नवी गाय विकत आणली आणि आपल्या आजोबासाठी त्याने काही मेंढ्या विकत घेतल्या.



फोटो–विद्यावृत

दादांनी तंबाखूला पुन्हा हात लावला नाही.

# तुम्ही पुढे राहाणार का ?

"हमीद, तू रात्री आमच्याबरोबर येणार आहेस ना?"

मिस्किल डोळयाच्या उंच हमीदने नकारात्मक मान हलवली.

"कां नाही, हमीद?" त्याचा निरोप घेऊ पाहणारा मित्र हुसेन समजूत घालायला परत आला. आम्हांला तू हवा आहेस. तूं असल्यास की खूप गंमत येते. आणि—कारण काय आहे? गेल्या मंगळवारचा कार्यक्रम तुला आवडला नाही कां?

"मला तो आवडला होता."

"मग आजही चल ना."

"नाही, मी आज येणार नाही."

"मला वाटते, तुला धूम्रपान आवडत नसावे. हो ना?"

"मी धुम्रपान करतो हे तुलाही ठाऊक आहे."

"हो खरेंच, आणि तूं आल्यानंतर क्लबमधील आनंद, उत्साह द्विगुणित होतो. मला कळत नाही तूं कां येत नाहीस तें!"

"आता असे पहा, मी त्या दिवशी साऱ्या गोष्टींचा शांतपणें विचार केला. आहे आणि मला वाटते त्यांतून फायदा कांहीच नाही. त्यानंतर माझे डोकें दुखत होते. दोन दिवस मला शाळेचा अभ्यास करता आला नाही. क्रिकेट खेळताना मी कितीतरी झेल सोडलेत. मला कसाबसा संघामध्ये प्रवेश मिळाला हेच नशीब."

"सवय नसल्यामुळे झाले असेल कदाचित्. थोड्या सरावानंतर तुझे डोके विके काही दुखणार नाही."

"जरा थांब, अजून माझे संपले नाही. मी सारासार विचार केला आहे. एका बाजूला पाच सात मुलांबरोबरची गुलाबी संध्याकाळ आणि दुसऱ्या बाजूला डोके-दुखी आणि आळस. डोकेदुखी एकदा थांबेल पण आळसाचे काय? आपल्या वर्गातच पहाना. दोन तऱ्हेची मुले आहेत. एकीकडे हुषार मुले नि दुसरीकडे जेमतेम पास होणारी. आणि हुसेन, तुला ठाऊक आहे, आपल्या क्लबचा एकहि सभासद हुषार मुलांमध्ये मोडत नाही. फुटबॉलचा संघ बघ, आपल्यातील फक्त एकच तिथे आहे. क्रिकेटच्या संघात दोन आहेत. आणि त्यांचीही निवड डळमळीत आहे. मी सगळीकडे पाहिले, आपल्या क्लबचे धुम्रपान करणारे लोक कुठेच नाहीत.

"माझ्या ओळखीच्या लोकांशाही मी विचार केला. सहा सात जणांनी धुम्रपान सोडण्याचा प्रयत्न केला. पण ते त्यांना जमले नाही. माझा युसूफ नावाचा काका होता. त्याने सिगारेट सोडण्याचा प्रयत्न केला. तीन आठवडे पार पडले. त्याला खाणे, पिणे, झोपणे सारे काही अशक्य झाले नि त्याने पुन्हा ती सुरू केली. तो मला यात न फसण्याचे नेहमी सांगत असतो. आणि मला कसल्याही सवयीच्या आहारी जाणे आवडत नाही.

"माझे आजोबा सैन्यात होते तेव्हा धुम्रपान करायचे. तो त्यांच्या जेवणाचाच एक भाग होता. घरी आल्यानंतरही दोन वर्षे हे सुरूच होते. आणि मग एके दिवशी त्यांनी तंबाखू सोडायचा निर्णय घेतला. सारे जण त्यांना हसले. "किती दिवसासाठी सोडताहांत?" म्हणून त्यांची हेटाळणी केली. पण त्यांनी खरोखर तंबाखू सोडली. आता ते ऐंशी वर्षांचे आहेत.

"शिवाय मी बरेच जणांना त्याविषयी विचारले. प्रत्येकाने मला धुम्रपान करू नकोस म्हणून बजाविले. आणि आपणही ते करायला नको होते असे त्यांना वारंवार वाटत होते. आता तूच विचार कर, तंबाखू ओढणे चांगले आहे का? मला तरी तसे वाटत नाही, एवढेच !"

हुसेन विचार करीत निघून गेला. हमीदच्या या वागण्याने त्याच्या क्लबचे बरेच सभासद कमी होणार हे त्याला माहीत होते. कारण बरेच जण हमीदचे अनुकरण करीत.

बरेच लोक आपल्या सोबत्यांना त्यांच्या कामात, करमणुकीत आणि विचारात आपल्या मागोमाग नेतात. पाण्याने उतारावरून वाहावे तितक्या सहजतेने ते हे करतात. असे पुढारीपण चांगले की वाईट हे नेत्याच्या शीलावर अवलंबून असते. ठाम तत्वनिष्ठा आणि तात्काळ निर्णय घेऊ शकणारा माणूस मोठ्या जमावाचे नेतृत्व करू शकतो. फक्त धैर्य तेवढे हवे. तुमच्या मागोमाग लोक येतील किंवा तुम्ही तरी कुणाच्या मागोमाग जाल! तुम्ही कोणत्या बाजूचे आहात ?—



या आधी गीता कधी सहलीस गेली नव्हती.

# सुमति कां गेली नाहीं ?

"आई कधी कधी विचित्रच बोलते," सुमति स्वतःशीच म्हणाली. चालता चालता ती विचार करीत होती. "मला नाही वाटत मी आज दुसरें कांही करावें असे देवाला वाटत असेल म्हणून; आणि त्याला तसे वाटले तर तो मला नाही कां सांगणार? कारण लहान मुलींना सहलीच्या वेळी दुसरे कांही सुचतच नाही मुळी. "

सुमति पुलावर आली. थोडा वेळ थांबून पुलाच्या खाली छिद्रांतून काळ्या शांत पाण्याकडे पाहिले आणि चालू लागली. थोडी पुढे जाते तोच तिला एक हुंदका ऐकू आला. सुमतिने आजूबाजूला पाहिले आणि खाली नदीच्या किनाऱ्या कडेहि पाहिले. तिथे झाडा–झुडपांच्यामध्यें बसून रडणारी गीता तिला दिसली.

"गीता, काय झालें ग?" सुमतिने ओरडून विचारलें.

गीताने कांहीच उत्तर दिले नाही. उलट ती अधिक मोठ्याने रडूं लागली. ती सहलीसाठी निघाली होती हे सुमतिने ओळखले. तिचा डबा जवळच होता, शिवाय शाळेचा गणवेश लख्ख धुवून इस्त्रीसुद्धां केलेला दिसत होता.

"चल गीता," सुमति तिच्याकडे जात म्हणाली. "आपण लवकर वर जायला हवे. नाहीतर आपल्याला गाड्या मिळायच्या नाहीत."

"पण–पण मला येता येणार नाही. माझे पैसे हरवले आहेत. मला आता घरीच बसावें लागणार !"

"घरी जा अन् धावत पैसे घेऊन ये," सुमतिने सुचविले.

"आई पैसे देणार नाही, कारण तिच्याजवळ पैसेच नाहीत. मी जाधवबाई-साठी काटक्या गोळा करून हे पैसे मिळविले होते. मी यापूर्वी कधीच सहलीला गेलेले नाही, आणि यावेळी जायची खप इच्छा होती." तिच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले.

"काय? कधीच गेली नाहीस यापूर्वी?" सुमतिने आश्चर्याने विचारले.

"नाही," गीता म्हणाली. "एवढे पैसे जमवायला मला चार आठवडे लागले. पैसे माझ्या हातातच होते. मी पुलावर बुटाची लेस बांधायला थांबले आणि माझे पैसे तिथल्या फटीतून थेट खाली पडले."

"आता काय करणार ?" सुमति म्हणाली.

त्या शाळेच्या इमारतीपासून फारशा दूर नव्हत्या. सुट्टीचा तो पहिलाच दिवस होता, आणि मुलींना घेऊन शिक्षक सहलीला जाणार होते. मुलांचा कोलाहल त्यांना ऐकू येत होता. मग गाड्या सुरू व्हायचाही आवाज आला. गीताने आपली पिशवी भरली. ती उदास मुद्रेने घराकडे निघाली.

सुमतिच्या कानात कुणीतरी कुजबुजले. ती ताडकन उठली. पण तिथे एका म्हाताऱ्या बेडकाखेरीज कुणीच नव्हते. पण तिला ते शब्द स्पष्ट ऐकू आले होते, "जर देवाला तू काही करावेसे वाटत असेल तर ते करायला तू मागेपुढे पाहू नकोस."

सहलीतल्या गंमतीजंमतीचा विचार सुमतिने सोडला नसता तर ते अशक्यच होते, पण तिला एकदम आठवले की गीता आतापर्यंत कधीच सहलीला गेलेली नाही.

दुसऱ्याच क्षणी सुमति पळत पुलावर गेली. तिने गीताला गाठले.. आपल्या रुमालातून पैसे काढून तिला देत म्हणाली, "हे घे पैसे, गीता. तू आता लवकर पळ, नाहीतर तुला उशीर होईल." आपला निर्णय बदलणार तर नाहीना याचीहि तिला भीति वाटत होती.

गीता डोळे मोठे करून पहात राहिली. " तू काय करणार आहेस?" तिने विचारले.

"हॅं, मला सहलीचे काहीच वाटत नाही– म्हणजे फारसे काही वाटत नाही,' सुमति उत्तरली.

गीता प्रथम तयार नव्हती. पण तिची इच्छा फार होती. शिवाय सुमतिहि आग्रह करीत होती. शेवटी ती तयार झाली.

"आपण आपले डबे पण बदलू या!" सुमति म्हणाली. ती कुठलीहि गोष्ट अर्धवट करीत नसे. तिला माहीत होते की गीताचे जेवण अपुरे आहे. ते सहलीचे जेवण नव्हतेच मुळी! त्यांनी डब्यांची अदलाबदल केली. आणि मग गीता टेकडीच्या दिशेने पळाली. सुमति तिला प्रोत्साहन देत होती, "लवकर पळ गीता."

सुमतिची आई स्वयंपाक करण्यात गुंतली होती. तिच्या एका हातात पळी होती आणि दुसऱ्या हाताने तिने कढीचे पातेले धरले होते. तेवढ्यात दार लोटून सुमति आत आली.

"काय ग, काय झाले?" आई हातातल्या पळीने कढी ढवळीत म्हणाली. "तुझे पैसे हरवलेत वाटते?"

"नाही. मी ते गीताला दिले. तिचे पैसे पुलाखाली हरवले. आणि ती कधीच सहलीला गेली नव्हती. –कधीच!"

सुमति आपले अश्रू आवरण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होती. पण तरीहि दोन तीन अश्रु बाहेर आलेच. आईने पळी खाली ठेवली आणि सुमतिला जवळ घेत ती म्हणाली, "रडतेस का सुमति? माझी सुमति किती शहाणी आहे हे मला माहीत आहे."

त्यांनी गीताचा जेवणाचा डबा उघडून पाहिला. गीता नुसती एक चपाती आणि थोडीशी घट्ट आमटी घेवूनच सहलीला चालली होती.

"मी डबा बदलविला याचा मला आनंद होतो," सुमति म्हणाली.

आईने तिला शाबासकी दिली. दिवसभर ती तिचे कौतुक करीत होती. त्या दिवशी त्यांनी बाहेरच्या आंब्याच्या झाडाखाली जेवण केले. त्यावेळी उन्हाचे कवडसे कसे जेवणाच्या टेबलाभोवती फेर धरून नाचत होते, आणि नंतर त्या दोघी जंगलात रानफुले आणायलाहि गेल्या.

"कां कुणास ठाऊक? मला आज अधिकाधिक आनंद होत आहे," एकदां सुमति आईला म्हणाली सुद्धा.

गीता परत जातांना सुमतिच्या घरी आली. "मला इतका आनंद कधीच मिळाला नव्हता. सुमति, मी तुझी मैत्री कधीच विसरणार नाही हं, कधीच नाही!" ती म्हणाली.

"माझ्यासाठी सुद्धां आजचा दिवस फार आनंदाचा होता," झोपतांना सुमति म्हणाली.

त्याचे कारणही तिला ठाऊक होते.

# एका हत्तीची गोष्ट

एकेकाळी मलबारमध्ये जम्बो नावाचा एक मोठा हत्ती होता. तो लहान होता तेव्हा जंगलांत आपल्या आईबरोबर मोठ्या कळपांतून फिरायचा. हा कळप एकदा जंगलांतून फिरला की तिथे साफसूफ व्हायचे. कारण ते झाडांवरची पाने खाऊन टाकायचे आणि खाली पडलेली पाने आपल्या मोठाल्या पायांनी तुडवून टाकायचे. नदीतून फिरणे आणि एकमेकांवर सोंडेने पाणी उडविणे यात त्यांना मोठी गम्मत वाटत असावी.

परंतु ही मजा फार दिवस टिकणार नव्हती. एके दिवशी ते हत्ती होते तिथे बरेच लोक तुतार्‍यांचा व ड्रमचा प्रचंड आवाज करीत आले. त्या शिकार्‍यांना घाबरून जनावरे पुढे पळत सुटली. परंतु त्यांना थांबावे लागले. कारण ते सर्व मोठ्या पिंजर्‍यांत सापडले. प्रत्येक हत्तीला पकडून माणसाळवण्यात आले. त्यांना काम करण्याचे शिकविण्यात आले.

जम्बो मोठा होऊन इतका सुंदर दिसूं लागला की त्याला महाराजांना देण्यांत आले. त्याला झोपायला खूप वेळ मिळायचा. फारसं काम नसायचं. असायचं तेव्हा त्याला आवडेल असंच असायचं. ते त्याला उत्तम भरजरी पोषाखाने सुंदर सजवायचे. त्याच्यावर महाराज आरूढ व्हायचे. जम्बो एवढा दिमाख राजाच्या पदरी असलेल्या दुसर्‍या कोणत्याहि हत्तीचा नसे. त्याला पाहणारा प्रत्येक जण म्हणे "केवढा हा भव्य हत्ती!"



फोटो–गोविंद लाल

हत्ती अतिशय हुशार असतो. त्याला कित्येक गंमतीदार कामे शिकविली जातात. वर एक छोटा हत्ती दुसऱ्या हत्तीस झुलवीत आहे.

परंतु प्रत्येक प्राणी वृद्ध होतो. जम्बोच्याहि नशिबी ते होतेच. श्रम करून उपजीविका करणाऱ्या एका कामगाराने जम्बोला विकत घेतले.

जम्बो खूप काम करू लागला. निरुपयोगी वस्तूंचा ढीग रचणे, दगडांच्या भिंती उभारणे आणि प्रचंड ओझी पाठीवरून वाहणे हे त्याचे काम होते. तो आपले काम इतक्या चांगल्या प्रकारे करी की त्यामुळे त्याच्या मालकाला तो फार आवडू लागला. त्याच्या धन्याचे सर्व कुटुंब त्याच्यावर ममता करू लागले.

परंतु जम्बोची खरी मैत्री जमली ती एका लहानग्या मुलाबरोबर. जेव्हा जम्बोला काम नसायचं तेव्हा तो त्या मुलाबरोबर असायचा. तो मुलगा जम्बोच्या सोंडेशी खेळायचा आणि जम्बो त्याला सोंडेने उंच उचलून धरायचा.

एके दिवशी मुलाने आपले वडिल आणि जम्बो ज्या समुद्र किनाऱ्याजवळ काम करीत होते तिथे यायला वडिलाजवळ परवानगी मागितली. तिथे इतर अनेक मुले होती. ते सर्व वाळूत मजेत खेळत होते. तेवढ्यात एक प्रचंड लाट आली आणि सर्व मुलांना समुद्रात घेऊन गेली. जम्बोने मुलांची ओरड ऐकली आणि लगेच तो त्यांची सुटका करण्यासाठी धावला. क्षणाचाहि उशीर न करता तो समुद्रात शिरला. मोठ्या प्रयासाने त्याने धडपडणाऱ्या मुलांतील दोघांना सोंडेने पकडले आणि किनाऱ्यावर आणले. पुन्हा तो समुद्रात गेला. इतरांना पकडले व किनाऱ्यावर आणले. अशा प्रकारे त्याने सर्वच मुलांना वाचविले. नंतर जसं फार मोठं काही घडलंच नाही अशा आविर्भावात तो पुन्हा आपलं नित्याचं काम करू लागला.



कधी कधी टोनी फार खोड्या करीत असे.

# ख्रिसमसचे मर्म

ती ख्रिसमसची सकाळ होती. घंटा वाजत होत्या, पक्षी धीटपणे दाणे टिपण्यासाठी उडत होते. मुले आपली खेळणी घेऊन खेळत होती. त्यांच्यावर सूर्याचे ऊन पडले होते. हवेत उत्साह ओसंडत होता. इतक्यांत ऑन्ट बीबीला आवाज ऐकूं आला. बँग . . बँग. ती लगेच बागेच्या जवळील व्हरांड्याकडे धावत गेली.

"मी मुळीच सांगणार नाही!" लहान परंतु संतापयुक्त किरटा आवाज ऐकूं आला. ऑन्टबीबीने हळूच दरवाज्याची कडी काढली आणि दरवाज्याच्या कोपऱ्यांतून पाहिले. आणि तिला काय दिसले? – तिथे मधोमध पाय रोवून संरक्षक पवित्र्यांत तो उभा होता. त्याच्याभोवती नवी खेळणी पसरली होती. खेळण्यांच्या कपाटाशेजारी आया उभी होती. तिचा चेहरा रागाने लाल झाला होता. केस अस्ताव्यस्त झाले होते. आणि तिच्याभोवती खेळाची पेटी, आगगाड्यांच्या चित्राचे पुस्तक आणि मोठा रबरी चेंडू होता.

"हे बघ, टॉनी ! हे बघ !" ती पुन्हां पुन्हां ओरडत होती.

"हे घे, थेरडे!" टॉनी ओरडला आणि त्याने गाडीचे पुस्तक तिच्यादिशेने भिरकावले. ते भिंतीवर आपटून खाली धप्कन पडले. इतका वेळ टॉनीने ऑन्टबीबीला पाहिलेच नव्हते. तो फारच रागांत होता.

"टॉनी!" भीति व आश्चर्ययुक्त आवाज आला. "काय करतो आहेस तू?"

टॉनी अपराध्यासारखा मागे वळला आणि त्याने हातातला निळा पोलीस जमिनीवर टाकला.

"ऑन्टबीबी, मला बाहेर जायचे आहे. परंतु आया जाऊ देत नाही. म्हणून मी माझी खेळणी तिच्यावर भिरकावली," हे बोलताना त्याला स्वतःचीच लाज वाटत होती. कारण ऑन्टबीबीबद्दल त्याच्या मनात आदर होता. साहजिकच आपला खट्याळपणा तिला कळू नये असे त्याला वाटत होते.

"खरेच बीबी, हा इतका काही त्रास देतो की काय करावें हेच मला समजत नाही," असे म्हणत आयाने सगळी खेळणी जमवून कपाटात ठेवली.

"हे बघ, टॉनी ! मी इथे आले ते तुला बाहेर नेण्यासंबंधी आयाला विचारण्यासाठी. पण माझ्याबरोबर चांगला मुलगा हवा. तेव्हा तू प्रथम आयाकडे क्षमा माग."

"मी नाही मागणार!" टॉनीने उत्तर दिले.

ऑन्टबीबीबरोबर जाण्याची इच्छा आणि आयाची क्षमा मागण्याबद्दल नाराजी या दोघांच्या पेचात तो पडला.

"मग तू माझ्याबरोबर येत नाहीस तर!" ऑन्टबीबी निश्चयाने म्हणाली. तिने आपले हातमोजे सरसावले नि दाराकडे वळली.

"मला नेच. आया, मला माफ कर!" टॉनी म्हणाला. "मला माझी हॅट आणि कोट दे!" अखेरीस लढाई संपली. दहा मिनिटांनी ऑन्टबीबी हातात मोठी टोपली घेऊन रस्त्यावर आली. तिच्यासोबत टॉनी होता.

"आपण कुठें जात आहोत, ऑन्टी?" टॉनीने चौकशी केली.

ती दोघे दुतर्फा घरे असलेल्या अरुंद रस्त्यावर आली होती. ऑन्टबीबी स्मित करीत म्हणाली, "आपण एक मुलगा पाहणार आहोत आणि तो इथे राहतो."

ते एका घराजवळ थांबले. दार ठोठावताच आतून खणखणीत आवाज आला, "आत या." ऑन्टबीबीने दार उघडले. ती एक लहानशी खोली होती. टॉनीने

आजुबाजूस उत्सुकतेने पाहिले. लहानशा चुलीत काही लाकडे होती. खोलीत फारसे सामान नव्हते. टेबलाजवळ एक स्त्री बटाटे सोलीत बसली होती. आणि कोपऱ्यात खाटेवर एक लहान मुलगा होता. त्याचा चेहरा बारीक, पांढरा, काहीसा गंभीर आणि उत्सुक होता.

मिसेस अँन्ड्रूज ही बघ मी आलेय. तुम्हा दोघांनाही ख्रिसमसबद्दल शुभेच्छा. मी टोपलीतून काही वस्तू तुमच्यासाठी आणल्या आहेत. "बिली कसा आहे?" ती पुढे आनंदाने म्हणाली. "बिली, मी माझे वचन पार पाडलेय्. हा माझा पुतण्या टॉनी !" ती मग टेबलाजवळ बसलेल्या स्त्रीजवळ गेली. टॉनी मुलाकडे गेला.

"तू बाहेर का खेळत नाही ?" टॉनीने विचारले. बिलीच्या फिक्कट गालावर किंचित् लाली चमकून गेली.

"मला चालता नाही येत. मला पाठीचे दुखणे आहे."

"चालता येत नाही ?" टॉनीने विचारले. " मग दिवसभर काय करतोस?"

"मी वाचतो," बिली अभिमानाने म्हणाला. "एक बाई मला पुस्तके देतात. त्यानी मला बायबलही दिले आहे. मी डोळे मिटून पडतो आणि वादळाच्या वेळी समुद्र कसा दिसत असेल यासारख्या अनेक गोष्टीचा विचार करतो."

"तू कधी समुद्र पाहिला नाहीस?"

बिलीने मान हलवून नकार दिला. तो म्हणाला, "या खोलीशिवाय मी काहीच पाहिलेले नाही. जेव्हा मला फार वेदना होतात तेव्हा या साऱ्या गोष्टींची चीड येते. पण मग मी देवाची प्रार्थना करतो."

"आज तुला काही बक्षिसा मिळाल्या कां ?" टॉनीने विचारले.

"नाही ! आईला ते शक्य नसते. पण आज ख्रिसमसचा दिवस आहे हे मला ठाऊक आहे. तेव्हा मी नाताळची गाणी म्हटली. बाईनी मला ती शिकविली."

"मला खूप बक्षिसा मिळाल्या, पण मी त्या रागानेआयावर फेकल्या. आता मला वाईट वाटते. मला जर असे इथे पडन राहावे लागले तर मी काय केले असते मला माहीत नाही."

टॉनीने आजूबाजूला पाहिले. तो गंभीर झाला. त्या तिथल्या बिनसामानाच्या, गचाळ खोलीची आपल्या प्रशस्त, सुंदर खोलीशी तुलना करूं लागला. या मुलाला तर चालताहि येत नाही ! टॉनीला आपल्यासारख्या सुखसोयी कुणाला लाभत नसतील याची कल्पनाही नव्हती. हळूच तो ऑन्टबीबीकडे गेला नि तिच्या कानात म्हणाला, "मी आणूं?"

तिने स्मित करीत मान डोलावली. टॉनी मुलाकडे गेला.

"आम्ही आतां घरी जाणार आणि ख्रिसमसच्या निमित्त मी तुला कांही भेटी आणणार' समजले ! माझ्याकडे किती आहेत! तुझ्याकडे काहीच नाही!" तो म्हणाला........

"आया, मला इतके वाईट वाटते तुझ्यावर खेळणी फेकल्याबद्दल ! मी तसें आतां कधीहि करणार नाही. कारण जेव्हां मला बाहेर जायचे असेल आणि तू मला अडवशील तेव्हा मला आठवेल, एक मुलगा असा आहे की ज्याला चालता येत नाही की कुठे जाता येत नाही. मी त्याच्यासाठी आगगाडी, निळा पोलीस आणि काही पुस्तके नेणार आहे. मला जरा ती काढून देतेस का आया ? "

"अवश्य ? हेच तर ख्रिसमसचे खरे मर्म आहे. " आया उद्गारली.

"काय म्हणालीस?" टॉनीने विचारले.


"निस्वार्थीपणे जगून दुसऱ्यांना सुखी करावे." असे म्हणत तिने कागदात खेळणी बांधायला सुरवात केली.

# ग्रोटीअसची सुटका कशी झाली.

ऑलिव्हर क्रॉमवेल जेव्हा इंग्लंडवर राज्य करीत होता त्या काळी ग्रोटीअस नांवाचा एक भला माणूस होता. त्याला योग्य वाटे त्याप्रमाणे तो देवाची भक्ति करी. परंतु याचकरिता त्याला तुरुंगात टाकण्यात आले होते. तो हॉलंडमध्ये राहात असे. लोवेस्टीन येथील प्रचंड दगडी किल्ल्यांत त्याला कोंडून ठेवण्यात आले होते. किल्ल्याभोवती रुंद, खोल खंदक होता. किल्ल्यावर जाणाऱ्यांना झुलत्या पुलावरून जावे लागे. ग्रोटीअसला जेव्हा तिथे नेण्यात आले, तेव्हा या पुलावरून, तसेच दगडी किल्ल्याच्या तेरा प्रचंड दरवाजांतून आत जावे लागले होते. या दरवाजांना घट्ट कड्या घालून त्यांना मोठी लोखंडी कुलुपे लावण्यात आली होती. ग्रोटीअसची सुटका होणार नाही याकडे अधिकारी वर्ग दक्षतेने पाही.

ग्रोटीअसच्या पत्नीस त्याला किल्ल्यात भेटायला मुभा होती. त्याच्या मित्रांना त्याला पुस्तके पाठविण्याची सवलत होती. ग्रोटीअस हा फार अभ्यासू होता. तो खूप पुस्तके वाचीत असे. ठराविक वेळेला लाकडी पेट्यांतून ही पुस्तके त्याला पाठविण्यात येत असत.

सौ. ग्रोटीअस ही एक हुशार स्त्री होती. तेरा लोखंडी दरवाजातून आपल्या पतीची सुटका कशी करता येईल याचा ती सारखा विचार करीत असे. अखेर तिला एक युक्ति सुचली व तिने ती आपल्या नवऱ्यास सांगितली. त्यावर त्यांनी विचार केला. ती यशस्वी व्हावी म्हणून त्यांनी देवाची प्रार्थना केली. ती युक्ति



ट्रंकेत लपलेल्या ग्रोटीअसला घेऊन नाव पुढे गेली.

अत्यंत धोक्याची होती. तरी ती अंमलात आणण्याचा त्यांनी निश्चय केला. पुस्तकांऐवजी ग्रोटीअसलाच पेटीतून बाहेर पाठवायचे हीच ती युक्ति. त्यांनी ही हकीकत आपल्या एल्सजे नांवाच्या मोलकरणीस सांगितली. एल्सजे ही एक आस्थेवाईक ख्रिश्चन मुलगी होती. तिने मदत करायचे कबूल केले.

ही युक्ति जेव्हा त्यांनी अंमलात आणायचे ठरविले तेव्हा किल्ल्याचा मुख्य अधिकारी बाहेरगावी गेला होता व त्याची बायको सर्व काम पाहात होती. ग्रोटीअस पेटीत बसला. ती पेटी लहान व खूपच अरुंद होती. तरी सौ. ग्रोटीअसने त्यांत कापूस वगैरे टाकून प्रवासाचा नवऱ्याला फार त्रास होणार नाही याची काळजी घेतली होती. नंतर पेटीचे झाकण बंद करून तिला कुलूप लावण्यांत आले. किल्ली एल्सजेच्या ताब्यात देण्यात आली. मित्रांच्या घरी ती पेटी सुखरूपपणे आणण्याचे काम तिच्याकडे होते. ते काम फार धोक्याचे होते तरी तीहि तितकीच धीराची होती.

नंतर सैनिकांना बोलावून पेटी किल्ल्याबाहेर काढण्यात आली. ती नेहमीपेक्षा अधिक जड होती.

त्यातील एक सैनिक विनोदाने म्हणाला, "ग्रोटीअसच पेटीत असावा. ही फार जड आहे." त्यांच्या मनात मात्र तसे नव्हते. एल्सजेनेहि तो प्रसंग हसण्यावारी नेला.

तुरुंगाच्या दरवाजाजवळ अधिकाऱ्याच्या पत्नीनें पेटी उघडून पाहायची प्रथा आहे काय असे इतरास विचारले. बरेच दिवस तसे काही करण्यात येत नाही असे तिला सांगण्यात आले व पेटी सुखरुपपणे बाहेर जाऊ शकली.

पेटी नदीवर आणून होडीवर चढविण्यात आली. होडी चालू होताच एल्सजे पेटीवर बसली व पांढरा रुमाल हलवू लागली. हेतू हा की किल्ल्याच्या खिडकीतून पाहाणाऱ्या सौ. ग्रोटीअसला सर्व काही सुरळीत पार पडले हे कळावे.

जेव्हा होडी गोर्कुंच्या किनाऱ्यास लागली तेव्हा एल्सजेने होडीच्या मालकास ती पेटी गवांत नेऊन पोहचविण्याची गळ घातली. त्याकरिता तिला बरेच पैसे

द्यावे लागले. आत ग्रोटीअसला त्रास होत होता. होडीचा मालक व त्याचा मुलगा अशा दोघांनी मिळून अखेर ती पेटी एकचाकी हातगाडीवरून गावात आणली.

अखेर ते ग्रोटीअसच्या मित्राच्या घरी आले. पेटी मागच्या दरवाजात सुरक्षितपणे ठेवण्यात आली.

एल्सजेने घराच्या मालकिणीस त्या पेटीत काय आहे ते सांगितले तेव्हा ती बिचारी अगदी भेदरूनच गेली, आणि तरी पेटीकडे धावली.

"मालक, मालक," एल्सजे हाका मारू लागली. उत्तर काहीच येईना.

"काय, माझे धनी मरण पावले की काय ?" ती घाबरून उद्गारली.

परंतु तेवढ्यात झाकणाला आतून धक्का बसला. आतून कैद्याचा आवाज कानावर पडला. "मी जिवंत आहे. प्रथम मी तुझा आवाज ओळखला नाही."

पेटी उघडण्यात आली. ग्रोटीअस त्यातून बाहेर आला. घराच्या मालकिणीने त्याला काहीवेळ घरात लपविले. नंतर एका साध्या कामगाराच्या पोषाखात तो अॅन्टवर्प येथे निघून गेला. तिथे तो शत्रूपासून मुक्त होता. सौ. ग्रोटीअसला तिकडे कैद झाली. परंतु लवकरच तिचीही सुटका झाली. ती मग अॅन्टवर्प येथे आपल्या नवऱ्याला भेटली. देवाने आपली प्रार्थना ऐकून तुरुंगातून मुक्तता केली म्हणून त्या दोघांनी देवाचे खूप आभार मानले.

# खरा देव

आगीमुळे निवड झालेल्या देवाची ही गोष्ट ऐका !

एकदा संदेष्टा एलिया आहाब राजाला म्हणाला, "तू बालची भक्ती करतोस खरी. पण माझ्या देवाच्या आज्ञेशिवाय तुझ्या राज्यात पाऊस पडणार नाही की दंवसुद्धा पडणार नाही. आणि खरोखरच तीन साडेतीन वर्षे त्याच्या राज्यात पाऊस किंवा दंवहि पडलें नाही.

नंतर परमेश्वर देव म्हणाला, "एलीया, तू जा आणि आहाबाला भेट, व सांग की मी पृथ्वीवर पाऊस पाडणार आहे."

मग एलिया आहाबाकडे गेला आणि म्हणाला, "आता निरोप पाठव आणि साऱ्या इस्राएली लोकांना कारमेल डोंगरावर बोलव. बालचे चारशेपन्नास पुजारी आणि ॲश्टोरेथ देवतेचे चारशे पुजारी यांनाहि बोलावून घे."

लगेच आहाबाने निरोप धाडला आणि सर्व इस्राएली लोक कारमेल पर्वतावर जमा झाले. पुजारीहि आले. एलिया एकटाच पर्वतावर आला. कारण यहोवाचा तो एकटाच संदेष्टा होता, आणि त्याच्या मते यहोवा हाच खरा देव होता. इस्राएली लोकांचा देव !



परमेश्वराने एलियाची प्रार्थना ऐकली व यज्ञपशूला जाळण्यासाठी स्वर्गांतून अग्नी पाठवून दिला.

मग एलिया उभा राहिला आणि मोठ्याने म्हणाला, "लोक हो, तुम्ही असे दोन देवांच्या बाबतीत कुठवर अनिर्णित राहणार ? जर तुम्हाला यहोवा खरा देव वाटत असेल तर त्याची भक्ति करा ! किंवा जर बाल देव वाटत असेल तर त्याची पूजा करा!" पण लोक शांतच होते. कुणी काहीच बोलेना.

एलिया पुन्हा म्हणाला, "मी इथे आज यहोवाचा संदेष्टा म्हणून उभा आहे आणि तिकडे बालचे चारशे पन्नास पुजारी आहेत. आता आपण कोण खरा देव आहे हे ठरवू. बालच्या पुजाऱ्यांनी त्यांच्या वेदीवर यज्ञाची तयारी करावी. त्यांनी बैल कापून त्याचे तुकडे लाकडांवर रचून ठेवावेत. त्याखाली आग मात्र लावू नये. मी इकडे यहोवाच्या वेदीवरही यज्ञाची तयारी करतो. मग आम्ही आपआपल्या देवाचा धावा करू. स्वर्गातली आगच खरा देव कोण ते ठरवील."

"हो, असेच होऊ द्या !" सारे लोक ओरडले.

मग बालच्या पुजाऱ्यांनी बैल कापून वेदीवर यज्ञाची तयारी केली. यावेळी ते आग पेटविणार नाहीत हे एलिया दक्षतेने बघत होता. आणि मग त्यांनी बालचा धावा सुरू केला. "देवा, आमची प्रार्थना ऐक." पण त्यांना उत्तर मिळाले नाही. मग बालच्या पुजाऱ्यांनी वेदीवर चढून चाकूचे स्वत:वरच वार करून बालला रक्तदान करण्यास सुरुवात केली. हे रक्तदान सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालले होते ! पण बालकडून उत्तर आले नाही.

संध्याकाळ होताच एलियाने यहोवाची वेदी तयार केली. ती पूर्वीचीच होती पण मोडलेली होती. त्याने तिच्याभोवती खड्डा खणला आणि वर लाकडे ठेवली. नंतर बैल कापून त्याचे तुकडे केले आणि ते लाकडांवर ठेवले. आणि नंतर तो म्हणाला, "चार घागरी पाणी आणा आणि ते त्या यज्ञपशूवर ओता." त्यांनी तसे केले.

"पुन्हा तसेच करा." तो म्हणाला. आणि त्यांनी पुन्हा तसेच केले. असे तीनदा झाले. पाणी खाली ओघळले आणि पाण्याने भोवतालचा खड्डा भरून गेला.

नंतर एलिया पुढे आला आणि त्याने यहोवाचा धावा सुरू केला. तो प्रार्थना करीत असतानाच स्वर्गातून अग्नी खाली आला आणि यज्ञपशूचे हवन झाले, लाकडांनी एकदम पेट घेतला.

जेव्हा लोकांनी हे पाहिले तेव्हा त्यांनी खाली पडून दंडवत घातले आणि ते म्हणाले, "यहोवा हाच खरा देव ! यहोवा हाच खरा देव!" आणि ते बालच्या वेदीकडे पाठ फिरवून उभे राहिले. तो देव नव्हता. हे त्यांना कळून चुकले त्याला सूर्यदेव, अग्निदेव असे मानित असूनहि तो अग्नी पाठवू शकला नव्हता. खरा देव यहोवा आहे हे त्यांना समजून आले कारण त्याने यज्ञासाठी अग्नी पाठवून आपले देवपण सिद्ध केले.

# प्रामाणिकपणा हे सर्वोत्कृष्ट धोरण

बाळू आशेने दुकानांतल्या सायकलीकडे बघत होता. "या सायकलीची किंमत फक्त एकशे पन्नास" असे तिच्यावरील चिट्ठीवर लिहिले होते. किती सुरेख होती ती ! कशी चकाकत होती ! कित्येक महिने सायकल खरीदण्यासाठी तो पैसे साठवीत होता. आता त्याच्याकडे शंभर रुपये जमा झाले होते. राहिलेले कसे मिळवायचे ?

अखेर तो दुकानापासून दूर झाला व राजाबरोबर पळू लागला. राजा हा बाळूचा कुत्रा होता. तेवढ्यात एक उंच माणूस घाईघाईने बाजूने निघून गेला. तो गृहस्थ म्हणजे आपल्या वडिलांच्या परिचयाचे श्री. वॅटसन असावे असे त्याला वाटले. मग त्याला रस्त्यावर काही तरी दिसले व तो एकदम थांबला. क्षणात त्याने ते उचलून हातात घेतले. त्या काही करकरीत नव्या नोटा होत्या. कुणाच्या बरं पडल्या असतील त्या ?

पण बाळूच्या बाबतीत काय घडलं ? तो पुन्हा थांबला. त्याचा चेहरा किती विलक्षण झाला ! प्रथम त्याने नोटांकडे पाहिले. नंतर नुकत्याच गेलेल्या माणसाच्या दिशेने पाहिले. परंतु तो हलला नाही. त्याने त्या नोटा मोजल्या. दहाच्या पाच नोटा होत्या त्या. बाळूच्या मनात एक वाईट विचार आला. पन्नास रुपये ! सायकल घ्यायला हवे तेवढेच फक्त.



ज्या प्रमाणे कुंभार मातीला सुंदर आकार देतो त्याचप्रमाणे अनुभवाने चरित्राला आकार येतो.

"मी ते स्वत:ला का ठेवू नये ? कदाचित ते त्या माणसाचे पडलेले नसतील· मी कुठे पाहिले ? कदाचित ते वॅाटसनहि नसतील. असे विचार बाळूच्या मनात आले.

बाळूने ते पैसे खिशात टाकले. थोडावेळ तो त्या उंच माणसाला साफ विसरून गेला. त्याने शीळ घातली आणि राजाबरोबर जेवायला घरी निघाला.

"राजा, उद्या तुझ्याबरोबर मी सायकलने शर्यत खेळणार," तो कुत्र्याला म्हणाला.

बाळू आणि त्याचे वडिल या दोघांनी रात्रीचे जेवण सोबत केले. बाळूवर माया करायला व त्याची काळजी घ्यायला त्याची प्रिय आई नव्हती. परंतु बाळूचे वडिल हेच त्याचे सर्वस्व होते. त्यांना आपल्याला नोटा कशा मिळाल्या हे त्याला सांगायचं होतं. परंतु त्याने सांगितले नाही. "ते काय म्हणतील ?" असा विचार त्याच्या मनात आला.

वडिल काय म्हणतील हे त्याला माहीत होते. ते म्हणाले असते, " कुणाचे पैसे पडले ते तुला माहीत आहे काय ?"

त्यानंतर त्याला अन्नच गोड लागेना. त्याची भूकच गेली.

"बाळू, आज काही खात नाहीस तू? काही झालं काय ?" त्याच्या वडिलांनी त्याला विचारले. "आपण ती सायकल तुझ्यासाठी घेऊ आणि तुला फिरायला पाठवू, बरं का !"

त्यामुळे बाळूला अधिकच वाईट वाटले. जेवण झाल्यावर तो वडिलांच्या वखारीकडे निघाला. तेवढ्यात त्याला कुणीतरी समोरून येत असलेला दिसला. कोण बरे असेल तो ? हा तर खचितच गोपालराव पोलिस. बाळू तडक निघाला. वखारीत जाऊन तो मोठ्या प्रयासाने धापा टाकीत पोटमाळ्यावर चढला. हातावर आणि गुढघ्यावर सरपटत तो बाहेरचं दिसणाऱ्या भिंतीच्या तड्यापर्यंत आला. होय, पोलिस वडिलांशी दरवाजात बोलत होता. आता तो आत गेला. बाळूने लाकडावर शरीर झोकून दिले. आता काय करायचं ? काय करायचं ? गेल्याच आठवड्यात त्याच्या कानावर पडलं होतं की संबंध गावात त्याचे वडील अत्यंत सरळ आणि प्रामाणिक इसम आहेत म्हणून. त्यांना वाटलं होतं

की आपण त्यांच्यासारखे आहोत. परंतु प्रत्यक्षात आपण तसे नाही. मी चोरी केली आणि आता तर पोलिस मला तुरुंगात टाकायला आलाय." असे त्याला वाटले.

पुन्हा बाळूला आवाज ऐकू आले. त्याने पुन्हा भेगेतून पाहिले. पोलिस बाहेर येत होता. तो वर तर नाही ना येणार ?

वडिल त्याला सांगत होते. "तुम्ही जर रस्त्यावर जाऊन त्यांना काय करायचं ते सांगितलत–" तो काही कामासाठी वडिलांकडे आला होता तर ! तो बाळूसाठी नव्हता आला !

त्या रात्री जेवण झाल्यावर बाळू आपल्या वडिलांकडे आला. त्याने त्या त्यांच्यापुढे नोटा धरल्या.

"हे काय ?" वर्तमानपत्र खाली ठेवीत त्याचे वडिल विचारू लागले.

"मला– मला ते मिळाले." बाळू म्हणाला.

"ते कुणाचे आहेत हे तुला माहीत आहे ?"

"नाही. होय. मला वाटतं तो मोठा उंच माणूस होता."

"मोठा, उंच माणूस ? तसे उंच खूपच लोक असतात, माझ्या बाळा."

"मला वाटतं– तो वॅाटसनसारखा दिसत होता," बाळू म्हणाला.

"मला सर्व काही नीट सांग बघू." वडिलांनी बाळूला जवळ घेतले व विचारले. नंतर बाळूने सर्व काही वडिलांना सांगितले. आपण पोलिसाला कसे घाबरलो तेहि सांगितले.

"ठीक आहे बाळू, वाईट गोष्ट करणं आपल्याला आवडत नाही, होय की नाही ? तेव्हा आपण उद्या हे सर्व स्पष्टपणे सांगून टाकू. आपण सोबत जाऊ आणि श्री. वॅाटसनला ते पैसे देऊन टाकू. सायकलसाठी कसे पैसे मिळवायचे ते मी तुला दाखवीन. परंतु आपण हे पैसे मात्र ठेवायचे नाहीत," बाळूचे वडील त्याला म्हणाले.

# पुष्पा पुट ऑफ

तिचे खरे नांव पुष्पा पतोली. पण सगळेच तिला पुष्पा पुटॉफ म्हणायचे, अर्थात तिला हें नांव कसे मिळाले याची तुम्हाला कल्पना करता येईल. त्याचे असे आहे, ती सर्व कामे करणे भाग पडेल तेव्हांच करीत असे.

"पुष्पा एक गोष्ट न चुकता करते. ती म्हणजे सर्व कामे उशीरात उशीरा करणें!" असे जीनो काका म्हणायचे.

आई म्हणायची, "पुष्पा, ही तुझी वाईट खोड घालवायची तरी कशी ?"

पुष्पाच्या वाढदिवसाला फक्त तीन दिवस होते. आपले आईवडिल आपल्याला काय बक्षिस देणार याचा ती विचार करीत होती. बाजा मिळेल तर बरे असे तिला वाटत होते, पण त्याबद्दल आशा करायला जागा नव्हती. एका माणसाने तो विकायला तिच्या घरी आणला होता तेव्हा त्याचा आवाज ऐकून तिला बाजाबद्दल प्रेम वाटायला लागले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी तिची आई तिला म्हणाली, "शाळेत जायच्या आधी हे पत्र पोस्टात नेऊन टाक."

"होय आई" पत्र खिशात टाकीत पुष्पा म्हणाली.

जेव्हा ती शाळेजवळ पोहंचली तेव्हा तिथे मुली खेळताना दिसल्या. क्षणभर ती तिथे थांबली. मग शाळेंची घंटा झाली. साहजिकच पत्र खिशातच राहून गेले.



पुष्पा खेळात इतकी रमून जायची की तिच्याकडून होणाऱ्या कामाचा तिला अजिबात विसर पडायचा.

तिने पत्ता पाहिला. शेजारच्या गावातील एका माणसाला ते लिहिलेले होते. ती म्हणाली, "जवळचेच तर आहे. शाळा संपल्यावर टाकीन पोस्टात."

शाळा सुटेपर्यंत ती पत्राचे सारे विसरून गेली. पुष्पा जेव्हा संध्याकाळी अभ्यास करीत होती तेव्हा तिच्या आईने तिला विचारले, "पुष्पा, टाकलेस ना पत्र पोस्टात?

पुष्पा दचकली, तिने हात खिशावर ठेवला व मग हळूच म्हणाली, "सकाळी टाकीन."

"आता फारच उशीर झाला!" आई म्हणाली "ज्याला पत्र लिहिले होते तो गृहस्थ आज संध्याकाळी निघून गेला असणार. त्याचा नवा पत्ताहि मला माहीत नाही. ते तुझ्याचकरिता होते. तुझ्या वाढदिवसानिमित्त बाजाची मागणी केली होती त्याच्याकडे !"

"खरेच फार उशीर झाला आई?" पुष्पा उद्गारली.

"आता तो कुठे असेल कुणास ठाऊक ! जर तू पत्र वेळीच पोस्टात टाकले असतेस तर तो निघण्यापूर्वी ते त्याला मिळाले असते व त्याने तुझ्यासाठी वाजा आणला असता. आता उशीर झाला," आई म्हणाली.

चांगला धडा मिळाला नाही का तिला ? त्यामुळे पुष्पा सुधारली. तिचे जुनं नांव तसेच राहिले तरी !

Owned by the Oriental Watchman Publishing House, Salisbury Park, Poona 1.
Published and Printed by V. Raju at and for the Oriental Watchman Publishing House, Salisbury Park, Poona 1.—2041-73.